
# चैतन्य लहरी

सप्टेंबर-ऑक्टोबर २००२
अंक क्र. ९, १०




स्वतःला खऱ्या व
पूर्णार्थाने सहजयोगी
घडवणें याचा ध्यास बाळगा.













# अनुक्रमणिका


झाला महार पंढरीनाथ ........ २

श्री कृष्ण पूजा, अमेरीका २००२ ........ ५

गुरू पूजा, कबेला २००२ ........ १०

गरु पौर्णिमा, कबेला २००२ ........ १४

भवसागरासंबंधी उपदेश ........ १६

दहा गुरूंची अवतरणे : श्री साईबाबा ........ १७

विष्णू तत्त्व ........ १९

पर्वत - श्री माताजींनी केलेली कविता ........ २०

महाराष्ट्र सेमिनार २००२ ........ २१

गणपतीपुळे हवन कार्यक्रम ........ २३

पूजाविधीचे महत्व ........ २४



संपर्क :


चैतन्य लहरी

सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्वे नंबर ९८, भुसारी कॉलनी , कोथरुड, पुणे -४११ ०३८

टेलिफोन : ०२०-५२८ ०६६८, ५२८ ६१०५ इमेल : chaitanyalaharipune@rediffmail.com


सूचना :

सहजयोगी बंधू-भगिनींना नम्र विनंती सन २००२ चैतन्य लहरी अंकासाठी नवीन सभासद नोंदणी बंद केलेली आहे. तरी यापुढे ज्या सहजयोग्यांची वर्गणी येईल ती पुढील सन २००३ या वर्षासाठी जमा केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी. पुढील पानावर २००३ साठीचा देणगी फॉम दिलेला आहे.



## .......झाला महार पंढरीनाथ

आजकाल सर्व जीवन 'अर्थ'मय झाले आहे. शिक्षण, व्यापार, क्रीडा शासन, धर्म इ. क्षेत्रांमधें त्याचा प्रभाव कल्पनेपलीकडे वाढत चालला आहे. राजकारण तर विचारायलाच नको. भविष्यांत आणखी काय काय प्रकार बघायला मिळतील याची कल्पना करतानाही मति गुंग होऊन जाते. पैसा ही लक्ष्मी आहे असे आपण मानतो; पण त्याच बाबतीत माणूस लक्ष्मीचा अनादर होईल असे कसे वागूं शकतो हेच कळत नाहीं. त्याचे परिणाम असे गैरव्यवहार करणाऱ्यांना कसे भोगावे लागतात, नांवाजलेल्या कंपन्या कशा बुडीत निघतात ही उदाहरणें पण दिसतात पण माणसाचा भ्रम कांहीं कमी झाल्यासारखे वाटत नाहीं.

या विषयावर प.पू.श्रीमाताजींनी अनेक वेळां मार्गदर्शन केले आहे. पैसा हा पैसा म्हणून वाईट नाहीं, पण त्याच्या आहारी जाण्याइतके विवेकशून्य होणें हे घातक आहे व ठरणारच असे त्या वारंवार बजावत असतात.ही परिस्थिति बदलण्याचा एकमेव उपाय म्हणजे सहजयोग असेही त्यांनी सांगितले आहे. अगदी अलीकडच्या एका पूजा प्रवचनांत श्रीमाताजींनी सहजयोग्यांनी त्याबाबतीत आपल्यामधील औदार्य वाढवले पाहिजे असे सांगितले.

आपल्या'देण्या' च्या प्रवृत्तीमधून आपण प्रेमच व्यक्त करत असतो. लालसा जशी कमी होत जाते तसे महालक्ष्मीतत्त्व जागृत होत जाते व तेच आपल्या आर्थिक प्रश्नांची काळजी घेत राहते. मग पैशाची चिंता करत बसण्याचे कारण उरत नाहीं असा श्रीमाताजींनी उपदेश केला आहे.

हा उपदेश समजून घेताना पूर्वीची एक कहाणी आठवली. विठ्ठलाचा भक्त दामाजी सरकारी धान्यगोदामाचा अधिकारी होता. गांवांत दुष्काळ पडल्यावर लोकांचे हाल न पाहवून त्यानें धान्याची कोठारे उघडली आणि लोकांना हवे तेवढे धान्य घेऊन जाण्यास परवानगी दिली. कोठारे खाली झाली आणि दामाजीला पकडून राजदरबारांत आणण्यांत आले; शिक्षा जाहीर होण्याच्या वेळीं पांडुरंग महाराच्या वेषांत राजासमोर प्रगट झाला आणि धान्याची किंमत म्हणून मोहरांची थैली राजासमोर ठेवली. ही कहाणी कवितारुपांत सादर करतांना कवि म्हणतो 'झाला महार पंढरीनाथ'.........





॥ जय श्री माताजी ॥

चैतन्य लहरीच्या सर्व सभासदांना ही दीपावली सुखसमृद्धीची आणि भरभराटीची जावो. सर्वांना पुढील काळात सहजाची ध्यानधारणेमधील गहनता श्री माताजींच्या कृपेत मिळो, तसेच सर्वांकडून प. पू. श्री माताजींना अपेक्षित असणारे सहजयोगाचे कार्य घडो.आपल्या सर्वांमधील आत्मप्रकाश सर्वत्र उजळूं दे.





श्रीकृष्ण पूजा १८ ऑगस्ट २००२

# श्रीकृष्ण पूजा

प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश) कान्हाजोहरी, अमेरिका, १८ ऑगस्ट २००२

पैशाची आसक्ति व लालसा सोडून औदार्य-प्रवृत्ति बाळगा.


आज आपण श्रीकृष्णांची पूजा करणार आहोत. हे महान अवतरण पृथ्वीतलावर कशासाठीं आले हे तुम्हाला माहीत आहेच. हे अवतरण विराट रुप धारण केलेले नव्हते; पण या वेगळ्या रुपांत असल्यामुळे या देशांत समृध्दि आली. त्यांतून लोकांची मानसिकता उन्नत होऊन धार्मिक संस्कृति उदयास आली. त्यानंतर श्रीकृष्णांच्या उपदेशाप्रमाणें वागणारे व त्यांचा आदर करणारे अनेक थोर पुरुष इथें होऊन गेले आणि ही अमेरिका एक नवीन समृध्द राष्ट म्हणून नांवारुपास आले.

पण कालान्तराने लोकांच्या मानसिकतेमधील या अवतरणस्वरुपाचा आदरभाव नाहींसा झाला. कारण श्रीकृष्णांचे नांव घेणारे पण त्यांना खऱ्या अर्थानं न ओळखणारे असे हीन दर्जाचे लोक पुढे आले; श्रीकृष्णांजवळ अफाट संपत्ति व ऐश्वर्य होते; पण त्याचा वापर कसा करायचा व जीवनांत धर्माधिष्ठित व्यवहार करुन त्याची वाढ कशी करायची ही त्यांची शिकवण बाजूला सारुन या लोकांनी सत्तेचा गैरवापर करुन अधार्मिक मार्गांनी पैसा लुबाडणें, फसवणे, अयोग्य प्रकारांमधें पैसा उधळणे इ. वाईट प्रकार सुरु केले.

श्रीकृष्ण साक्षत् कुबेरच होते. त्यांना पैशाची गरजच नव्हती कारण अफाट संपत्ति त्यांच्या पायाशी लोळत होती. त्यांनी आपला महालही पूर्ण सोन्याचा बनवला होता. पण तो नंतरच्या काळांत पाण्याखाली गेल्यामुळे ती एक आख्यायिका आहे अशी समजूत झाली; पण आतां पाण्याच्या खूप खोलवर संशोधन होत असताना ती एक खरीच गोष्ट आहे असे आढळून आले आहे. हजारो वर्षे उलटल्यावर हा इतिहास खरा आहे हे सिध्द झाले याचा अर्थच आपल्यामधें त्यांची शक्ति आहे. ते सदैव सत्याच्या बाजूवर ठाम उभे राहिले आणि सत्याच्या आधारावरच त्यांचे कार्य झाले; जे असत्य होते त्याच्या विरोधात राहून त्यांनी त्याचा पराभव केला. सत्य हेच अंतिम सत्य असते व त्याचीच सत्ता सगळीकडे आहे हे दाखव ण्यासाठीच त्यांचा अवतार होता.

मी त्यांच्यापेक्षा अगदी वेगळी आहे. मला पैशाच्या गोष्टीच कळत नाहींत. पण त्याबाबतीत तेच मला सांभाळतात. मला पैसा मोजतासुध्दा येत नाहीं; बँकांच्याबद्दल मला कांहीं येत नाहीं. पण ती सर्व काळजी ते करीत असल्यामुळें मला पैशाची कधींच कमतरता पडली नाहीं, उलट भरपूर संपत्ति मिळाली.

त्यासाठीं तुम्हाला समाधान म्हणजे काय हें समजले पाहिजे. समाधानी वृत्ति झाल्यावर पैशाच्या गोष्टींकडे तुमचे लक्षच जात नाहीं. तुमच्या देशांत कांही मंडळीना खूप पैसा मिळाला. पण त्याचीच त्यांना चटक लागली आणि मग ते कसल्याही गोष्टींवर पैसा उधळू लागले. ही माणसाची स्वाभाविक वृत्तीच आहे. पण आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर पैशाचा हव्यास बाळगण्यासारख्या सर्व हीन प्रवृत्तींपासून तुम्ही मुक्त होता; पैसा असला तरी ठीक, नसला तरी कांही बिघडत नाहीं अशी तुमची समाधानी प्रवृत्ति बनते. जेव्हां त्याची खरोखरच गरज




असते तेव्हां तुम्हाला तो मिळतोही. हे सर्व श्रीकृष्णांचे आशीर्वाद आहेत आणि तेच तुम्हाला मदत करत असतात.

मी सहजयोग सुरु केला तेव्हा माझ्याजवळ एक पैसासुध्दा नव्हता. पण मला त्यामुळें कधीही प्रश्न पडला नाहीं. म्हणजेच श्रीकृष्ण कुबेर असल्यामुळें तेच पैसा पुरवतहोते. ते नेहमींच गरीबाला धन पुरवतात, सत्याबरोबर असणाऱ्यांच्या सर्व गरजा पुरवतात, त्यानुसार जगणाऱ्यांना सर्व मदत करतात. त्यांची कृपा असेल तरच तुम्हाला पैशाचा उपभोग घेता येतो. पण लोकांना पैसा मिळाला की आणखी पैसा मिळावा अशी हाव सुटते; म्हणूनच असे लोक जवळ असलेल्या पैशापासून आनंद मिळवू शकत नाहींत. आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर तुम्ही उपलब्ध पैशावरच संतुष्ट राहतां, पैशाची हाव होतच नाहीं; काही वस्तू जवळ नसली तरी तुम्हाला फिकीर नसते. मला कांही लोक म्हणायचे की-माताजी आपण श्रीकृष्णाची कुबेर म्हणून पूजा करुं या का? मी मुद्दामच होकार दिला; कारण पैशाच्या मागे लागण्याचे काय दुष्परिणाम होतात ते आतां तुम्हाला समजले आहे; त्यामुळें लोक चुकीच्या मार्गाला लागून स्वत:च्या देशाचेही कसे नुकसान करुन घेतात हेहि तुम्ही पहात आहांत. श्रीमंति मिळाली की लोक विमा-कंपनी, तेल कंपनी अशा धंद्यात पैसा ओततात व स्वत:ही तो वाया गेल्यावर पस्तावतात किंवा भ्रष्ट मार्गाने जमा झालेल्या पैशाचा अपहार उघडकीस येतो. भ्रष्ट लोकांना उघडकीस आणण्याचे कामही कुबेरच करत असतात.

आज कुबेराची पूजा करुन 'पैसा' या शब्दाचा खरा अर्थ आपण समजून घेणार आहोत. पैसा असणे म्हणजे काय, तो कशासाठीं हवा? या देशांत पैसा होता म्हणून इथें बरेच चांगले लोक आले आणि त्यांच्या चांगल्या कार्यामुळे इथें बऱ्याच चांगल्या सुधारणा झाल्या. पण मला वाटते की एकंदरीत अमेरिकन लोक चलाख असले तरी बुध्दीने जरा कमीच पडतात. म्हणून त्यांनी परदेशांतील अनेक बुध्दिवान लोकांना आपल्याकडे आणले; ही मंडळी आपापल्या विषयांत तरबेज असल्यामुळें त्यांनी त्या संबंधांत खूप कार्य केले. म्हणून अमेरिकन लोकांना या बुध्दिवान लोकांबद्दल आकर्षण व आदर होता; तितकाच ती बुध्दिमत्ता आपल्यां धंद्यासाठीं वापरुन पैसे कमावण्याची प्रवृत्ति वाढली. सत्याचा धर्म सोडला की हेच परिणाम होतात. आणि मग आपल्याच वस्तूंचा खप कसा वाढेल हा विचार बळकट झाला व त्यांचा प्रचार करुन जास्त जास्त पैसे कमावण्याच्या मागे लोक लागले.

नुकत्याच केलेल्या विमान-प्रवासांत आमचे विमान Las Vegas ला थांबले असतांना विमानांत जे प्रवासी चढले त्या सर्वांचे चेहरे कमालीचे उतरलेले दिसत होते. चौकशी केल्यावर मला सांगण्यात आले की त्या लोकांचे सर्व पैसे डुबले होते. म्हणजेकसे होते पहा, पैसे असले की लोक उड्या मारत राहतात पण पैसे संपले की तेच लोक रडू लागतात! मग अशा बेकार व अशाश्वत पैशाचा काय फायदा होणार? माणसाचा स्वभाव असा आहे की पैशाबरोबरच तो मायेच्या जाळ्यांत अडकतो आणि हवे-नको न बघता वस्तू खरेदी करण्याच्याच मागे लागतो आणि त्यापायीं मूर्खपणाच्या गोष्टी करतो. आतां त्यांना कांहीं प्रमाणांत ही मायेची भुरळ समजली आहे, त्यांच्यापैकी कांहींच्या हातात बेड्या पडल्या आहेत याचे मला समाधान नाटते. ही सर्व कुबेराच्या जादूची किमया आहे. श्रीकृष्ण अशा क्लृप्त्या चालवण्याअंत पटाईत होते; ते नेहमींच तुमच्यावर भुरळ पाडतात, उदा. पैशाची; मग त्या नादांत तुम्ही पैशाच्या मागे धावूं लागता आणि शेवटी तुमचा मूर्खपणा तुमच्या लक्षांत येतो. आमच्या देशांत एका शेख चिल्ली नांवाच्या माणसाची गोष्ट सांगतात; त्याला एकदां हातांत पैसे आले आणि ते वाढवण्याचा मोह पडला; त्या भ्रमांत त्याने बरीच अंडी विकत घेतली. मग त्या अंड्यामधून कोंबड्याची पिल्ले आल्यावर ती विकून खूप पैसा मिळवता येईल अशा स्वप्नात रंगून झोपी गेला. पण झोपेत त्या अंडयांवरच तो पडला आणि सगळी अंडी फुटून गेली! हे असे लवकर झाले तर बरे; नाहीं तर तुम्ही मायेमधें अडकून हातांत बेड्या पडण्याची वा तुरुंगात जाण्याची वेळ येते.

सहजयोगांत आल्यावर तुमच्या दृष्टिकोनांत समग्रता येते आणि या मायेचा विनाशकारी परिणाम तुमच्या लक्षांत येतो. हा दृष्टिकोन इतका जाणीवपूर्वक असतो की, तुम्हाला दुसरे कांहीं करावे





लागत नाहीं. माझे वेगळे आहे, मला पैसा समजत नाहीं हे सांगितलेच. पण तुम्हाला पैशाचा खरा अर्थ कळला-पैशानेच सर्व कांही मिळवता येते हे समजले- तरीही तो तुमच्यावर प्रभाव पाडू शकणार नाहीं आणि तेच तुमच्या चेहऱ्यावरुनही जाणवेल. हीच सहजयोग्याची खूण आहे; पैशाचा त्याच्या मनावर कांहीही परिणाम होणार नाहीं. कारण तो त्याच्या भौतिकतेच्या पलीकडे पोचलेला असतो; पैशाच्या पार गेलेलाच खरा सहजयोगी. पुष्कळसे सहजयोगी, विशेषत: पाश्चात्य देशांतील, प्रामाणिक असतात; पण भारतात तो एक रोगच आहे; इथें जसा व्हायरस इतर बाबतींत लागतो तसा तो भारतात पैशाच्या बाबतीत आहे आणि ते लोक पैशाच्या मागे लागले आहेत; त्यांना पैसा म्हणजेच सर्वस्व असे वाटते. पण उन्नतीच्या प्रवासांत तुम्ही एकदा नाभीचक्राच्या पार झालात की पैशाला कांही किंमत रहात नाहीं.

मी स्वत: दुसऱ्याला कांही द्यायचे असते तेव्हांच खरेदी करते. एरवी बाराजांत किती तरी, कांही फालतूही, वस्तू मांडलेल्या असतात. पण एक तर बाजारात जायला मी संकोच करते किंवा जिथें असा व्यवसाय चाललेला असतो तिथे असून नसल्यासारखी होते. त्याचप्रमाणे सहजयोग्यांनी आपले मन आत्म्याच्या संपर्कात ठेवले पाहिजे आणि त्याच्या शक्तीचा आनंद लुटला पाहिजे. हा आनंद मिळाल्यानंतर तुमच्यामधील सर्व हव्यास निकामी होतो. हे अगदी सहज होण्यासारखे आहे पण तुम्ही तसा प्रयत्न करीत नाही; किंवा तुम्ही गाडी किंवा इतर महागड्या वस्तूंनी भारुन जाता. खरे तर जास्त गाड्या असणें ही एक डोकेदुखीच असते नाहीं का? पण तरीही लोक जरुरीपेक्षा जास्त गाड्या घेतच राहतात; बहुतेक त्यात लोकांवर छाप पाडण्याचा विचार असावा व त्यातून त्या मंडळींना स्वत: फार मोठे झाल्यासारखे ही वाटत असेल. पण यांत कांही अर्थ नाहीं. सहजयोग्याजवळ आनंद मिळवण्यासाठीं आत्मा सदैव आहे, शिवाय त्याला कांहीं बाळगण्याची इच्छा नसते. कारण स्वत:साठी कांही ठेवणे किंवा घेणे ही डोकेदुखीच आहे.

त्याचबरोबरचे दुसरे तत्त्व म्हणजे महालक्ष्मी. तुमच्यामधें महालक्ष्मी तत्त्व जागृत असेल तर तुम्हाला कधींच पैशाचा प्रश्न पडणार नाहीं. आणि असलाच तर तो सहज सोडवूं शकाल. माझ्याबाबतीत तर हे तत्त्व कसे काम करते, कसा मार्ग काढते हे माझे मलाही कळेनासे होते. मला मनापासून या बाबतीत कांहीं इंटरेस्ट नसतो, पण कसे कोण जाणे, मी क्षुल्लक वस्तूची खरेदी केली तर विकायचे म्हटले की त्याला दसपट किंमत मिळते. हा महालक्ष्मीचाच चमत्कार म्हटला पाहिजे. सांगण्याचा मुद्दा हा की आर्थिक बाबतीत तुम्ही कसलीही काळजी करुं नका; हिशोब करत बसूं नका, बँकेत आपल्या खात्यावर किती शिल्लक आहे, कुठल्या पध्दतीने पैसे गुंतवावे इ. मधें अजिबात अडकूं नका. मी तर कांही लोक या सर्व हिशोब कटकटींमुळे वेडे झालेलेही पाहिले आहेत. सहजयोगी झाल्यावर तुम्हाला असलं कांहीं करण्याची जरुर नाहीं; सर्व कांहीं आपोआप घटित होत राहते. पैशाबद्दलची ही लालसा, माणसाच्या शरीरात रोग होतात तशी, तुमच्यामधेंच असते; सहजयोगाने शारीरिक आजार बरे होतात तसेच ही लालसाही उरत नाहीं.

या लालसेवर एकमात्र उपाय म्हणजे तुमच्यामधें उदारता मोठ्या प्रमाणांत आली पाहिजे. जितके तुमचे औदार्य वाढेल तितकी लालसा कमी होईल. समजा तुमच्या घरांत कुणाकडून भेटवस्तू आली तर ती दुसऱ्या कुणाला तरी देऊन टाका; त्यामागें आपल्याला ती नकोशी वाटते ही भावना मात्र असूं नये तर आपल्यासाठीं हे खूप भारी आहे हा विचार असावा. हा देण्याचा विचार नुसता मनांत आला की लगेच ज्या व्यक्तीला त्याची जास्त जरुरी व उपयोग होईल त्याचे नांव चटकन तुम्हाला आठवेल. आणि अशी वस्तू ज्याला द्याल तो माणूस इतका खूष होईल व तुमची मनापासून स्तुति करेल आणि तुमचा आनंद द्विगुणित होईल. दान करणें नेहमींच आनंददायक असते. म्हणून तुम्ही जास्तीत-जास्त उदार बनण्याचा प्रयत्न करा; त्यांतून तुमचे प्रेमच व्यक्त होत असते. मला पुष्कळ वेळां एखाद्या व्यक्तीला कशाची तरी कमतरता असल्याचे लक्षांत आले तर मी त्याबद्दलची नोंद मुद्दाम मनांमधे करुन ठेवते व वेळ आली की तीच वस्तू त्याला भेट म्हणून देते; अशा गोष्टीमधून तीच वस्तू माझ्या आवडीची असली तरी स्वत:साठी ती खरेदी करण्यापेक्षां कितीतरी






जास्त आनंद मला ती त्या व्यक्तीला दिल्यामधून मिळतो. बरेच लोक मला हे कसें समजते असे विचारतात तेव्हा मी त्याच्यामागें प्रेमभावनाच आहे असे सांगते. स्वभावांत हे औदार्य असणें याच्यासारखी जीवनांत दुसरी गोष्ट नाहीं, आपण उगीच अनेक प्रकारच्या वस्तूंचा संग्रह करत असतो; त्यापेक्षां त्या वस्तू प्रेम म्हणून दुसऱ्याला देणें फार चांगले. तसे केलेत की दुसऱ्याला तुमच्याबद्दल किती आपलेपणा आहे हे तुमच्या लक्षात येईल.

दुसरी गोष्ट म्हणजे तुमच्यामधील हावरटपणा दूर करण्यासाठीं तुम्ही सामूहिक स्तरावर कांहीं सामाजिक कार्य सुरु करा. गरीब लोकांच्या वस्तीमधे जाऊन पाहिले तर ते किती हालाखीच्या वातावरणात जगतात हे पाहिल्यावर तुमच्यामधील सर्व लालसा नाहींशी होईल. मग तुम्हालाच वाटेल की आपण आपल्या प्रपंचाची व पैशाची इतकी कशाला काळजी करतो? आणि हे सर्व पाहून तुम्हाला शॉकच बसेल. मी एकदा भारतांत, कलकत्यामधील एका निराधार, अत्यंत गरीब लोकांच्या वस्तीत गेले आणि त्यांची कमालीची दयनीय अवस्था पाहिल्यावर मला किती तरी दिवस घरीं जेवतांना घशाखाली घास उतरवत नव्हता आणि या कमालीच्या गरीब लोकांची परिस्थिती पाहून मला सारखे रडूं येत होते. हे सर्व अनावर झाल्यामुळें अशा पिडलेल्या लोकांसाठी आपण कांही तरी केले पाहिजे हा विचार सुरु झाला. अगदी तरुण वयांत मी एक कुष्ठरोग्यांसाठी निवास सुरु केला होता. त्याचप्रमाणे निराधार बालकाश्र, निर्वासितांसाठी आश्रम अशा बऱ्याच संस्था सुरु केल्या. त्यासाठीं मी पैशाकडे बघितले नाही; माझ्याजवळचा पैसा माझ्या स्वत:साठीचे खर्च व खरेदी दूर ठेऊन त्या कार्याकडे वळवला, माझ्या कांहीं वस्तू विकून पैसा उभा केला. या सर्व दानामुळे मला फार समाधान व आनंद मिळाला. तुम्हीही अशी उदारता वापरुन आनंद मिळवू शकता.

औदार्य हा कुबेराचा खास गुण आहे; ते कमालीचे उदार आहेत. त्यांच्यासारखे औदार्य तुमच्या जीवनांत आले पाहिजे. सहजयोगी एकूण उदार असतातच; मला तरी कुणी कंजूष असल्याचे कानावर आले नाहीं(अजून तरी). मला खात्री आहे की एक दिवस तुम्ही सर्वजण उच्च प्रकारचे व्यक्तिमत्त्व मिळवणार. सहजयोगामधें इतर पंथांसारखे तुम्हाला सर्व कांही - कपडे, घर, संसार, नोकरी, इ. त्याग करायला सांगितले जात नाहीं. कांही टाकून द्यायचे असेल तर हृदयांतील सर्व दोष, वाईट प्रवृत्ति इ.चा त्याग करायचा असतो आणि हे आंतुनच सहजपणें घडायला हवे; त्यासाठी वेगळे कांहीं सोडायचे नाहीं. त्यातून तुमचीच अध्यात्मिकता सुदृढ झाली की दुसऱ्याचे कांहीं हडप करण्याची इच्छाच होणार नाहीं. उलट तुमचीच 'देण्याची' प्रवृत्ति वाढेल.

या बाबतीत माझे वडील तर माझ्यापेक्षाही आणखी पुढच्या विचाराचे होते. त्यांच्या घराची दारे सदैव उघडी असायची, कुलूप लावून बंद करण्याची गोष्टच दूर. दारे उघडी ठेवली की चोर येणार नाहींत असे ते म्हणत. एकदां आमच्या घरांतील ग्रामोफोन कुणीतरी



पळवला; त्यांना खिन्न चेहऱ्याने बसलेले पाहून त्यांना त्याचे दु:ख झाले असेल असे माझ्या आईला वाटले; पण तिने तसे म्हटल्यावर ते काय म्हणाले असतील? तर ते म्हणाले 'हा ग्रामोफोन चोरणारा संगीताचा रसिक असला पाहिजे. पण त्याने रेकॉर्डस कां नाहीं नेल्या?' औदार्य दाखवण्याचे हे किती सुंदर उदाहरण! पण हे धर्म किंवा संस्कार शिकवून होत नाहीं कारण हे आंतमधून होणारे परिवर्तन असते.म्हणजेच आसक्ति सोडली की त्या वस्तूचा त्यागच केल्यासारखे होते. तसे झाल्यावरच तुमच्यामधील उदारता व दानत व्यक्त होते व त्याचा तुम्हाला आनंद मिळतो.


कुबेराचाच हा गुण आहे. कुणी म्हणतात त्यांना बँकांचे व्यवहारही समजतात. त्या काळीं बँक नव्हती; पण कुणास ठाऊक, मला तर वाटते कीं आपल्या बँकांवरही त्यांचे लक्ष असेल आणि म्हणून बँका अजून तरी नीट आहेत. कुबेर फार धूर्त, हुषार, चाणाक्ष व सतर्क आहेत. तुम्हालाही पैशाचे व्यवहार करतांना असेच काळजीपूर्वक व सावधानतेने राहिले पाहिजे. त्यांना पैशाची अजिबात लालसा किंवा आसक्ति नव्हती. त्यांची जीवनामधूनही हे दिसून येते. लहानपणीं गुरुजवळ असतांना ते आश्रमातील गाई-गुरांना चरायला घेऊन जात; नंतर नंदराजाकडे असताना गोप-गोपी व गुराख्यांबरोबर खेळत. सर्वसाधारण माणसांसारखेच त्यांचे लहानपण होते. त्यांना पैशाचा लोभ नव्हता; गोपींच्या घरांत लोणी ते चोरत कारण त्या घरांतले लोणी कंसाच्या सैन्याला विकत असत. म्हणजे त्या गोपींना पैसा मिळवण्याच्या लोभापासून मुक्त करण्याची ही त्यांची युक्ति होती.

त्यांच्या प्रत्येक कृतीमधें त्यांची उदारता व्यक्त होते. कमालीचे बुध्दिमान असूनही त्यांची अलिप्तता अशी होती की आपल्याच मामाला, कंसालाही ठार मारले. आमच्या भारतामधें नात्यागोत्यांना फार महत्व दिले जाते. बाप चोर, मुलगा चोर, नातू चोर असेही प्रकार असतात. मला तर याचे आश्चर्यच वाटते. चोराच्या घराण्यांत प्रामाणिक मनुष्य असलेला माझ्या तरी पाहण्यांत नाहीं. पण भारतामधें अत्यंत प्रामाणिक लोकही आहेत. आमच्या घरांतले सारे नोकरही अतिशय प्रामाणिक; जीवनांत समाधानी असल्यामुळें चोरण्याची कल्पनाच त्यांच्या डोक्यात नसायची. तसे केल्यास आपली लाज जाईल ही त्यांची भावना होती. शिवाय प्रामाणिकपणाला आदर व प्रतिष्ठा होती. एकवेळ जेवून राहतील पण आपल्या प्रतिष्ठेला तडा जाऊं देणार नाहींत.

म्हणून आपल्यामधील लालसा कमी करण्यासाठीं आपल्यामधील आत्मसन्मान टिकवला पाहिजे. चोरी कशासाठीं करायची, दुसऱ्याची वस्तू बळकावण्याची वासना का होते हे बघा. आत्मसन्मान असेल तर दुसऱ्याच्या वस्तूला हातही लावावासा वाटणार नाहीं. सामान्य नोकर जर हा नियम पाळूं शकतात तर त्यांच्यापेक्षां सुस्थितीत असलेल्या लोकांना ते अशक्य नाहीं. त्या नोकर माणसांची मनोवृत्तीच इतकी चांगली असल्यामुळे त्यांना आपला आत्मसन्मान जपणें ही कसल्याही प्रकारची लाससा भागवण्यापेक्षा जास्त महत्त्वाचे वाटते. ही माणसामधील लालसा कधीच तृप्त होत नसते. पुर्वी खूप श्रीमंत असणारी पण आतां निर्धन झालेली माणसे मी पाहिली आहेत, त्यांना जगणं म्हणजेच नरकयातना वाटतात.पूर्वीचा डामडौल त्यांच्या मनांतून जात नाहीं. तरीही त्यांतील मिथ्या -माया त्यांना सुटत नाहीं आणि स्वत:ला कंगाल, भिकारी, समजत राहतात. त्याच्या उलट पैसा कमावण्यासाठीं वाट्टेल ते करायला मागेपुढे न पाहणारे लोक असतात.

तुमची आत्मशक्ति बळकट झाली की तुम्ही इतर भौतिक साधनांची शक्ति तुच्छ मानायला शिकता.आजकाल मानवजात उन्नतीच्या मार्गावर प्रगट होण्या ऐवजी पैसा व तत्सम गोष्टींभोवतीच गोल-गोल फिरत आहे. म्हणून नाभी चक्र सुधारले पाहिजे, त्यानंतरच तुम्हाला समाधान मिळणार आहे. नाभीचक्र पूर्ण ठीक झाल्यावरच तुम्ही कुबेराच्या स्थितीला येणर आहांत. म्हणून नाभी-चक्राकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. माणसामधें इतर अनेक दोष व कमतरता असतात पण लालसा व हव्यास, हा फार घातक आहे. त्याच्यावर जर आपण नियंत्रण मिळवू शकलो तरी जगांतील परिस्थिति खूप सुधारेल.

सर्वांना अनंत आशीर्वाद.





गुरु पूजा २१ जुलै २००२

# गुरु–पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश) कबेला : २१ जुलै २००२


डाव्या बाजूवर संपूर्ण ताबा मिळवून उजवी बाजू कार्यरत करा.

भारतांत यावर्षी पावसाळ्याला फार उशीर होत असल्यामुळें सगळीकडे काळजीचे वातावरण आहे. म्हणून मी बंधन दिले आणि इथें पाऊस सुरु झाला. भारतामधेंही पाऊस लवकरच सुरु होणार असल्याचे टी.व्हीवरच्या बातम्यांवरुन समजले; इथेही तीच परिस्थिति होती आणि इथले लोकही पावसाळा कधीं सुरु होतो याची वाट बघत होते. दोन दिवसांपूर्वीच पहिला पाऊस पडला आणि आजही पाऊस आहे. निसर्गालाही आपले सर्व प्रश्न समजतात. पर्जन्यदेवतेच्या या आज्ञाधारकपणाचे मलाही आश्चर्य वाटते.

आजचा गुरुपूजेचा दिवस एक महान दिवस आहे, म्हणून मानवाला सत्याच्या प्रकाशांत आणण्याचे कार्य ज्या थोर गुरुंनी या पृथ्वीवर अवतरण घेऊन केले त्या सर्वांचे आपण स्मरण करणार आहोत. आजपर्यंत अनेक संत-पुरुषांनी मानवाला शाश्वत आनंद कशात आहे हे समजावण्याचा कष्टपूर्वक प्रयत्न केला. पण परमात्म्याशी एकरूपता मिळवण्यासाठीं अध्यात्मिक जीवनाची अत्यंत आवश्यकता आहे हे लोकांच्या लक्षातच आले नाहीं. मानवजातीला उन्नतीच्या मार्गावर आणण्याचे प्रयत्न कांहीं विद्वान पंडितांनी केले; पण त्यांची दिशा चुकीच्या मार्गाकडे गेल्यामुळें त्यांना शुध्द सत्य समजले नाहीं आणि सत्याचा आभास निर्माण झाला आणि मानवी जीवनाचे परमोच्च उद्दिष्ट जाणण्याच्या प्रयत्नांत ते अयशस्वी झाले.

उन्नतीचा प्रवास डाव्या व उजव्या अशा दोन मार्गांनी चालत आला. भारतामधें फार पूर्वी अनेक योगीजन जंगलात जाऊन खडतर तपश्चर्या करत असत; त्यांनी पंचमहाभूतांनाही आपल्या अंकित करण्याची विद्या मिळवली होती. पण हे सर्व तप उजव्या बाजूचे असल्यामुळें त्याला कांहीं अर्थ नव्हता. आपल्याला आतां साधी मेणबत्ती वापरून कसली व कुठें बाधा आहे हे जाणता येते; म्हणजे साध्या मेणबत्तीच्या ज्योतीमधेंही हे ज्ञान आहे ही केवढी मोठी गोष्ट आहे. समजा तुमच्या हृदयामधें कांहीं बिघाड वा दोष असेल तरीही मेणबत्तीच्या उपचारामध्यें कळून येते आणि त्या चक्रावर मेणबत्तीचा उपचार केला तर तुम्ही स्वत:च आपला हा दोष दूर करुं शकता. म्हणजे त्या ज्योतीमधेही असे दोष दाखवून देण्याची व ठीक करण्याची क्षमता आहे. म्हणूनच भारतामधें अग्नीची (तेजाची) पूजा करण्याची प्रथा होती; त्या काळच्या ऋषी-मुनींना अग्नीची ही क्षमता ज्ञात होती. त्याचप्रमाणें इतर महाभूतांबद्दलही त्यांना सर्व ज्ञान होते आणि त्यामुळेंच पूजाप्रसंगी या पंचमहाभूतत्त्वांना- त्यांच्या देवतांना - त्यांच्या पूजेसाठीं आवाहन केले जात असे.

या प्रकारच्या सिध्दींमुळे उन्नती फक्त उजव्या बाजूवर होत गेली. डावी बाजू दुर्लक्षित ठेऊन ही उजव्या बाजूकडची प्रगति घातक असते. तशी उजवी बाजू कमकुवत असणेही एरवी नुकसानकारकच असते; पण त्यासाठी डाव्या बाजूची प्रथम वाढ झाली पाहिजे. म्हणूनच सहजयोगामधें आपण सुरवातीला डाव्या बाजूवर अधिक लक्ष केन्द्रित केले. डावी बाजू म्हणजे प्रेम व करुणा; त्या भावना आपल्यामधें सदैव जागृत राहतात आणि त्यांतूनच




आपल्याला देवीचे आशीर्वाद मिळत राहतात. देवीचे अधिष्ठान आपल्यामधेंच आहे. देवी-महात्म्यामधें त्याचे सर्व वर्णन आहे. म्हणून सहजयोगामधून तुमची डावी बाजू बळकट करण्यावर मी भर दिला.

वर सांगितल्याप्रमाणें जे लोक उजव्या बाजूवर जास्त भर देतात ते कालान्तरानें फार आक्रमक प्रवृत्तीचे बनतात. त्यांनी सर्व पंचमहाभूतांवर ताबा मिळवला असला तरी ते फार शीघ्रकोपी बनतात; लहान -सहान कारणांवरुन दुसऱ्याला शाप देणें, दुसऱ्याशी कठोरपणें व्यवहार करणें इ. गोष्टींकडे त्यांचा कल झुकतो. अर्थात या गोष्टींचा आत्म्याशी कांहींच संबंध नसतो. त्यामुळें त्याचे दुष्परिणामच होतात व असे लोक स्वत:चाच घात करुन घेण्याच्या स्थितीला पोचतात. सहस्रारामधें मी असे उठसूठ शाप देण्याची संवय असलेले खूप लोक पाहिले. या प्रकारच्या ऋषींजवळ करुणा अजिबात नसल्यामुळें शाप देण्याचीच शक्ति वापरण्यांत ते तरबेज होतात. अशा तऱ्हेच्या उजव्या बाजूचे कार्य करणाऱ्या लोकांचा परमात्म्याबरोबर कांहींच संबंध रहात नाहीं आणि ते एक प्रकारचे राक्षसच बनून जातात. बुध्दीचा, वैचारिक क्षमतेचा असा दुरुपयोग झाल्यामुळें अहंकार प्रमाणाबाहेर बळावतो. ही फार घातक व भयानक स्थिति असते व त्याचे दुष्परिणाम फार वाईट असतात.

सहजयोगातून अनेक लोकांचे असाध्य रोगही दूर झाल्याची उदाहरणें तुम्हाला माहीत आहेतच. उजवीकडे प्रमाणाबाहेर गेलेल्या लोकांना ब्लड-कॅन्सर होंऊ शकतो पण तोही बरा झालेले लोक आपल्याकडे आहेत. पण असे लोकही पुन्हा आक्रमक बनून स्वत:चेच खरे व बरोबर आहे असे समजून परत पहिल्या स्थितीवर येतात. त्यांचे लक्ष सारखे दुसऱ्यांच्या चुका दाखवण्याअकडे असते; त्यांचे चित्त स्वत:कडे न पहाता सारखे बाहेर धावत असते; स्वत:मधले दोष त्यांच्या कधींच लक्षांत येत नाहींत तर दुसऱ्यांचे दोष दाखवण्यात ते तरबेज असतात. त्यामुळें ते पुन्हां उजव्या बाजूकडे जातात व परिणाम म्हणून पुन्हां गंभीर आजाराला निमंत्रण देतात. मग ब्लड-कॅन्सर बरा होऊनही अल्झायमरसारखा भयानक रोग उद्‌भवतो. याला मुख्य कारण म्हणजे देवीच्या नम्रपणाच्या उपदेशाचे पालन न करणें; त्यामुळेच तुम्ही स्वत:चे नुकसान करुन घेताच पण बरोबर इतरांनाही त्याचा त्रास होतो. म्हणून उजव्या बाजूकडे दुर्लक्ष करुन तुम्ही कधींच प्रगति करुं शकणार नाहीं. उलट दुसऱ्यांना शाप देणें वा संकटात पाडणे याच्याच मागें लागता व त्यांतच भूषण मानता. दुसऱ्या कुणाजवळ तुमच्यासारखी सिध्दि नसली तर अशामुळें तुमची स्वत:ची शक्ति क्षीण होते.

म्हणून डाव्या बाजूची काळजी घेणें आणि ती कार्यान्वित करणें सर्वांत चांगले. दुसऱ्यासंबंधी वाईट बोलण्यापेक्षा स्वत:मधें काय कमी आहे, आपण कुठें कमी आहोत हे पहावे. स्वत:ला फार मोठे व अधिकारी व्यक्ति समजणे आणि दुसऱ्यांना त्रास देणें चांगले नाहीं. उजव्या बाजूचे कार्य करताना कधीं कधीं खूप यशही मिळते; हिटलर तसा सुरवातीला यशस्वी झाला पण नंतर त्याच्यांतील क्रूरपणाचा अतिरेक झाला. आजकाल बरेचसे राष्ट्रीय नेते व शासनकर्ते उजव्या बाजूमधून कार्यकारभार करत आहेत; डाव्या बाजूकडून कार्य करणारे कांहीं लोक होते पण आतां तुम्हाला डाव्या बाजूच्या सर्व शक्ति मिळाल्या आहेत; कांही थोडे उजवी बाजूकडे गेलेले लोक असले तरी तेहि सुधारतील.

आता मला हे मुख्य करुन सांगायचे आहे की तुम्हाला डाव्या बाजूचे महत्त्व लक्षांत आले आहे, कुण्डलिनी जागृत होऊन परमात्म्याचे ज्ञान तुम्हाला झाले आहे, डाव्या बाजूकडील सर्व शक्ति तुम्हाला प्राप्त झाल्या आहेत. म्हणून आंता तुम्ही उजव्या बाजूकडे या व तिचा वापर करा; म्हणजे दुसऱ्यावर प्रभुत्व मिळवण्यासाठीं नाहीं तर स्वत:च स्वत:वर ताबा ठेवण्यासाठीं. आत्मपरीक्षण करुन आपण स्वत: कुठे चुकतो, चुकीचे कां वागतो, दुसऱ्याला त्रास होईल असे कां वागतो, दुसऱ्याच्या वरचढ होण्याचा प्रयत्न कां करतो इ.कडे






लक्ष द्या. चुका करणारे, वाईट वागणारे लोक असतातच पण प्रेम आणि समजूतदारपणा वापरुन तुम्ही त्यांच्यावरही वेगळाच प्रभाव पाडूं शकाल. म्हणून हे गुण आपल्यामधें आहेत का हे पहाण्याचा प्रयत्न करा आणि त्याचा उपयोग करत रहा. तुम्हाला प्रेमशक्तीच वापरली पाहिजे; औदार्य ठेवले पाहिजे, कणव वाटली पाहिजे. कांही फार उध्दटपणे बोलणारे, कुणासमोरही कुत्सितपणे बोलणारे लोक मला दिसतात, त्यांचा तो स्वभाव असेल पण त्यांनीही तो सुधारला पाहिजे. कठोर भाषा संतांना शोभत नाहीं; संत सदैव शांत असतात आणि नेहमी मृदु भाषेतच दुसऱ्याशी बोलतात. म्हणून आत्मपरीक्षण करुन आपण कुठें चुकतो व काय चुका करतो हे लक्षात घेऊन स्वत:ला सुधारा आणि मग उजव्या बाजूमधून कार्य करुन शक्ति मिळवा.

डावी बाजू भक्कम केल्यावर उजव्या बाजूकडील सर्व शक्ति तुम्ही मिळवूं शकता. पृथ्वीवर अनेक गुरुंचे अवतरण झाले हे तुम्हाला माहित आहेच. उदा राजा जनक. ते राज्यकर्ते महाराज होते आणि फार विद्वान व उदार स्वभावाचे होते; आपले राज्य त्यांनी न्यायपूर्वक, कष्टपूर्वक व कौशल्यपूर्ण कारभाराकडे लक्ष दिले, जनकल्याणाच्या अनेक गोष्टी केल्या आणि आदर्श राजा असा लौकिक मिळवला. पण त्यांच्याजवळ अलिप्तता व नि:संगपणा हा फार मोठा व दुर्मिळ गुण होता. डाव्या बाजूवर पूर्ण नियंत्रण मिळवून उजव्या बाजूचे कार्य करणाऱ्या व्यक्तीचे राजा जनक हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे; ते कधींही विचलित झाले नाहींत वा सत्ता- अधिकाराच्या मोहात पडले नाहींत. तुम्हा आत्मसाक्षात्कारी लोकांना हेच आदर्श बाळगले पाहिजेत. तुम्ही प्रेम, करुणा व सूज्ञता पूर्णपणे बाणवली पाहिजे आणि त्यांचा योग्य आविष्कार झाला पाहिजे. येशू ख्रिस्त याचेच उदाहरण आहे; ते अवतरणच होते आणि त्यांच्यामधे प्रेम व क्षमेची अपरंपार शक्ति होती; शिवाय डोंगर-पठारावरुन त्यांनी प्रवचनें करुन अध्यात्मिकतेचाच संदेश दिला. ते सत्य सांगत होते म्हणून लोकांनी त्यांचा दु:स्वास केला, त्यांना सुळावर चढवले, पण तरीही ते आदरणीयच राहिले. ते अवतरण होते पण तरीही आपल्या शक्ति दुसऱ्यांना देत राहिले, खूप भ्रमंति केली, त्यासाठीं कांही सुविधा नव्हत्या पण तरीहि अडून बसले नाहीत आणि अनेकांना पुनरुत्थानाचा संदेश दिला. सहजयोग्यांनीही त्यांच्यासारखे होऊन डावी बाजू सांभाळत उजव्या बाजूचे कार्य केले पाहिजे. तसे केले नाहीं आणि नुसतेच उजव्या बाजूनें कार्यक्रम आयोजित करणें, सर्व व्यवस्था करण्याची धडपड करायची अशा कार्यांत दंग राहिले तर त्यांची उजवी बाजू बिघडून त्यांनाच त्रास होतील. सहजयोग्यांना डाव्या बाजुवर ताबा मिळवता आला की अध्यात्मिकता संपूर्णपणें स्वत:मधें सिध्द करण्यासाठीं त्यांनी उजवी बाजू कार्यरत केली पाहिजे. उजव्या बाजूचे कार्य म्हणजे सामूहिकता, दुसऱ्यांनाही ते मिळवून देतां येईल हें पहा, लोकांबरोबर संबंध वाढवा व त्यांनाही सहजयोग सांगा. त्यांनी कांहीही प्रतिक्रिया केली तरी नाराज न होता त्यांच्याबद्दल करुणा बाळगा आणि त्यांना समजावून घ्या.

ज्या लोकांना आत्मसाक्षात्कार अजून प्राप्त झाला नाहीं त्यांच्याबद्दल तुमच्या मनांत आपुलकी व कळकळ असली पाहिजे. तुम्ही आत्मसाक्षात्कार मिळण्यापूर्वी कसें होता ते आठवा आणि आत्मसाक्षात्कार न मिळालेल्या लोकांचे दु:ख समजून घ्या. तुम्हाला सर्वांना आत्मसाक्षात्कार मिळाला आहे तो तुमच्या स्वत:साठी नाहीं; म्हणून स्वत:शीच संतुष्ट न राहता जास्तीत जास्त लोकांनाही त्याचे लाभ मिळवून देण्याचे काम तुमचे आहे आणि तुम्ही ते केलेच पाहिजे. हे करु लागलात की तुम्हालाच आश्चर्य वाटेल की तुमचे व्यक्तिमत्व उजळून येईल आणि दुसऱ्याच्या अडचणी तुम्हाला बरोबर जाणवतील. त्याचप्रमाणें तुमच्यामधील सुप्त कलागुणही प्रकट होतील; तुम्हाला कविता सुचेल, लेखक बनाल. दुसऱ्यांबरोबर असा संपर्क साधून, त्यांना सहजयोग व त्यातील तुमचे अनुभव सांगाल तेव्हांच हे घडून येईल. एरवी नाही. म्हणून आतां स्वस्थ बसूं नका, लोकांबरोबर सहजयोगातून संबंध वाढवा, त्यांना जागृति देण्यांत संकोच वा भीती वाटून घेऊं नका आणि याच्यामुळें तुम्ही उजव्या बाजूचे व्हाल अशी शंका घेऊं नका.

सर्वप्रथम तुम्ही अत्यंत नम्र बनले पाहिजे. नम्रपणा तुमच्यामधें पूर्णपणें मुरला पाहिजे. आतां अशा माणसाचा फायदे घेणारे असतात, हे चालायचेंच पण त्यानें तुमच्या करुणेला धक्का लागता कामा नये. त्या नम्रपणामधून तुमची आसक्ति हळुहळु कमी





होईल.काहीं लोक अत्यंत संकोची, भिडस्त असतात, पण तो सोडला पाहिजे. मी तर पाहते की लोक कोणा-कोणा गुरुच्या नादी लागतात आणि त्यांच्याबद्दल बिनधास्तपणे इतरांना सांगत असतात. मग सहजयोगी त्या बाबतीत कां मागे राहतात? म्हणून उत्साहानें लोकांना सहजयोगाबद्दल सांगत चला अणि जास्तीत जास्त लोकांना सहजयोगात आणा. नम्रपणा राखून व आक्रमकपणा न दाखवता सहजयोगाचा प्रसार करा. हे तुम्ही केलेत तर सहजयोगात तुम्ही खूप कांहीं मिळवाल पण हे करु शकला नाहींत तर सहजयोगातून तुम्ही कांहीच मिळवले नाहीं हे लक्षांत घ्या.गुरुपूजेच्या या दिवशी हे नीट लक्षांत घ्या आणि आजकालच्या माणसांच्या बिकट परिस्थितीत त्याचे महत्त्व नीट समजून घ्या.

या कार्यात यशस्वी होण्यासाठीं परमात्म्याबरोबर तुमचे परिपूर्णपणे तादात्म्य झाले पाहिजे. पण तुम्ही पैसा, अधिकार, सत्ता, तुमच्या इतर महत्त्वकांक्षा याच्याच मागे राहिलात तर सहजयोग कार्यान्वित होणार नाहीं; उलट करुणा व सूज्ञता वापरलीत तर तुम्हाला मिळालेले परमात्म्याचे ज्ञान(सत्य)तुम्ही इतर खूप लोकांपर्यंत पोचवूं शकाल. किंबहुना तीच तुमची एकमेव इच्छा होऊ दे. इतर सर्व इच्छा व कामना दुय्यम आहेत.सहजयोग पसरवण्याची ही इच्छा इतकी सुंदर आहे की ती कार्यान्वित होत असल्याचे पाहून तुमचा आनंद व समाधान वाढतच राहील; तुमचे सर्व प्रश्न सुटतील. सर्व अडचणी दूर होतील. हीच खऱ्या सहजयोग्याची ओळख आहे आणि तुम्ही प्रत्येकाने असे महान सहजयोगी बनावे हीच माझी इच्छा आहे. आजच्या या दिवशीं आपण पृथ्वीच्या पाठीवर आजपर्यंत आलेल्या अनेक संतपुरुषांचे स्मरण करु या; त्यांना खूप त्रास भोगावे लागले, खूप यातना सहन काराव्या लागल्या पण त्यांनी तळमळीनें लोकांना सत्य समजावण्याचे कार्य सोडले नाहीं, अविरत चालवले. आजच्या या पूजेच्या पवित्र दिवशीं तुम्ही प्रत्येकाने (माझ्याबरोबर तुम्ही कांहीं नाते मानत असाल तर) शपथ घ्या की सहजयोग पसरवण्याच्या कार्याला पूर्णपणें वाहून घेऊं. तुम्ही पुरुष असा वा महिला, तुम्ही आजकालच्या सर्व समस्यांमधून मार्ग काढण्यासाठीं जगभरात सहाजयोग पसरवलात तर तुम्ही सद्गुरुच बनाल; लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाला पाहिजे. आत्मसाक्षात्कार देतो तोच गुरु एरवी नुसते सहाजयोगाबद्दल सांगून वा प्रचार करुन कांही होणार नाहीं.

तुमच्या हृदयांतच प्रेमाचा सागर आहे, तेच प्रेम कार्यान्वित करा आणि तुमच्यामधील अध्यात्मिकतेचा आनंद अनुभवा.जितक्या लोकांना जागृति मिळवून द्याल तितके तुमच्यामधील गुरुतत्त्व सिध्द होत जाईल.


सर्वांना अनंत आशीर्वाद

संत मीराबाई

पानीमें मीन प्यासी, मोहे सुन सुन आवत हांसी।
आत्मज्ञानविण नर भटकत है, कहाँ मथुरा, काशी ॥
मीरा के प्रभु गिरिधर नागर, सहजमिले अविनाशी।

संत कबिर

उंचे पानी ना टिकै नीचे ही लहराय।
नीचा होय सो भरी पिवै उंचा प्यासा जाय॥





## गुरु पोर्णिमा


गुरु पोर्णिमेच्या दिवशी श्रीमाताजींनी केलेले प्रवचन, कबेला, २४ जुलै २००२

दया, ममता, करुणा व प्रेमाचा आविष्कार होतो तेव्हांच खरा सहजयोगी घडतो.

आज गुरु पौर्णिमेचा दिवस आहे. हे तुमच्या ध्यानात आले हे खरोखर विशेष आहे. आजचा पोर्णिमेचा दिवस म्हणजे पूर्ण चंद्र हे मला माहित आहे. पण दोन दिवस आधी सहजयोग्यांकरिता (सोयीसाठी) शुक्रवार , शनिवार व रविवार या दिवशी आयोजन करावे लागते. यात काही गैर नाही कारण चंद्र आपल्यासाठी सदैव असतोच व आपण चंद्रासाठी. गुरुतत्वावर मी बरेच काही सांगितले आहे. पूर्वी या पृथ्वीतलावर अनेक गुरु झालेत पण ते स्वत: जन्मत:च आत्मसाक्षात्कारी होते व त्यांनी कोणाला आत्मसाक्षात्कार दिला नव्हता, हाच फरक आहे. आत्मसाक्षात्कारी आत्मे होते ते सुफी झाले, त्यांना निरनिराळ्या उपाधि लावल्या गेल्या. पण स्वत: ते आत्मसाक्षात्कारी असल्यामुळें त्यांना उपजतच खूप ज्ञान होते.(सर्व चक्रांचे ज्ञान होते) व त्यांनी ते लोकांना दिले. कदाचित पूर्वजन्मातील ती प्राप्ती असेल वा ते कुणातरी मोठ्या गुरुंचे शिष्यही असतील. पण त्यांना आत्मसाक्षात्कार व नंतरचे लाभ याबद्दल सर्व ठाऊक होते.

पण या सर्वांमधून फक्त महंमदसाहेब एकटे -मिराजबद्दल- कुंण्डलिनीच्या उत्थानाबद्दल बोलले याबद्दल भारतात सांगितले गेले. इतर देशात अगदी स्पष्टपणे -मिराजबद्दल- सांगितले गेले. पण तुमच्या उत्थानानंतर तुमचे हात बोलतील असे ते म्हणाले. यात त्यांनी दोन गोष्टी सांगितल्या. प्रथम म्हणजे तुमचे हात बोलतील, म्हणजेच आत्मसाक्षात्कार तुम्हांला मिळाल्याची ती खूण आहे आणि दुसरी गोष्ट त्यांनी -मिराज व पांढरा अश्व याबद्दल सांगितले म्हणजे दुसरे काही नसून ती कुण्डलिनीच.त्यांनी कुण्डलिनी शब्द न वापरता पांढरा अश्व शब्द वापरला. आत्मसाक्षात्काराचा लोकांवर काय परिणाम ते त्यांना ठाऊक होते. तुमच्यासाठी एक उलगडा होता. हे सहजयोगासाठीही सहाय्यक ठरले. तुम्ही आत्मसाक्षात्कारी आत्मे आहात, कारण तुम्हांला चैतन्यलहरी जाणवतात आणि तसे तुम्ही घडलात हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

भारतात अनेक संत झालेत, एकापेक्षा एक वरचढ; ते जे सांगून गेले ते किती मोलाचे होते ! पण त्यांची महत्ता लोकांना कधीच समजली नाही. तुर्कीमध्येही अनेक सूफीसंत झालेत. सुन्नी पंथामध्येही जगात अनेक असे सूफीलोक होते. आपल्याकडे अवतार जरी नव्हते तरी ते जन्मत: आत्मसाक्षात्कारी आत्मे मानव स्वरुपात झालेत. त्यामुळे त्यांनी ज्य सोप्या भाषेत जे सांगितले ते मानवाला उपकारकच होते.अवतारांनी जे सांगितले ते अगर्द पलीकडचे(गहन)होते. पण हे साक्षात्कारी संत फार निराळे होते. त्यातील काही कवि होते जसे भारतात कबीर झाले; ते कोठून आले, त्यांचा जन्म कुठे झाला, त्यांचे आई - वडिल कोण होते कशाचाच पत्ता नव्हता ! पण त्यांनी आपल्या काव्य रचनेतून जे काही लिहीले






त्यावरुन ते महान सहजयोगीच वाटतात. त्यातील वर्णने व सत्यकथन हे खूपच आकर्षक आहे. त्यांनी स्वत:ला कुठला धर्म असा लावला नाही. जेव्हा ते मृत्यू पावले तेव्हा हिंदू मुसलमानात वाद झाला. त्यांच्या देहसंस्काराचे काय? पण आश्चर्य म्हनजे त्यांच्या मृतदेहावरील चादर काढल्यावर त्यांच्या शरीरावर फुले पसरली होती व त्यातून ते सर्व वादविवाद पोकळ ठरले.

सहजयोगात असल्या कुठल्या एकाच धर्माचा विचार नाही; ' विश्व निर्मल धर्म' हाच आपला एक धर्म आहे. सर्व धर्मांच्या अतिरेकतेचा आपण त्याग केला पाहिजे. हे सर्व लोक आपापसात हाणामाऱ्या करतात. एकमेकाला ठार करायला उभे आहेत. हे काही धार्मिकतेचे लक्षण नाही. या सर्व अत्याचारी भयंकर गोष्टी ते कशा करतात यावर विश्वास बसत नाही.योगी किंवा संत असेल तर त्याच्यात क्रूरतेचा अंशही नसतो, उलट ते जीवाचा त्याग करायलाही मागेपुढे पहात नाही. वाटेल ती किंमत देतील पण ते कोणाप्रती क्रूरता ठेवणार नाही. पण जे देवाच्या नावावर अथवा धर्माच्या नावाखाली अत्याचार करतात ते कधीच धार्मिक असणार नाहीत. सहजयोगात या गोष्टींना थारा नाही. दया, ममता करुणा व प्रेम ही सहजयोग्यांची लक्षणे आहे. ती नसतील तर तो सहजयोगी नाही. आपण वेगळ्या तऱ्हेचे आहोत, वेगळ्या प्रकृतीचे आहोत, आत्मसाक्षात्कारी आहोत, आपण इतर सर्वांच्या पलिकडचे आहोत. आपल्याकडे चैतन्य आहे ते तुम्हाला सर्वत्र पसरावयाचे आहे.या धरतीवर ज्यांना उध्दार हवा आहे त्यांना आत्मसाक्षात्कार मिळविण्यास तयार असलेले दिसतील.आजच्या या मंगल दिवशी आपण असा संकल्प करा की मी ही विशेष शक्ति तुम्हांला देऊन आशिर्वादित करत आहे. स्वत:च्या समस्यात अडकू नका, ते महत्वाचे नाही. त्या आपोआप सुटतील. अशा वैयक्तिक समस्येबद्दल किंवा इतर समस्येबाबत मला बरीच पत्रे येतात. त्याबाबत तुम्ही आपल्या आत पहा. तुमच्या आत काय घडते, आम्हाला समस्या का आहेत, आपले कर्तव्य काय , आम्हाला आत्मसाक्षात्कार का मिळाला, हा अध्यात्मिक ठेवा का मिळाला,तो कसा जतन करणार याचे रोज चिंतन करा. अगदी अर्धा तास पुरे आणि मग समजेल की आपण किती समर्थ आहोत.संतानी खूप कष्ट घेतले बरेच काही त्यांनी लिहून ठेवले, लोकांचा त्रास सहन केला सर्व काहे केले. तुम्हाला हे सगळे करण्याची आता अ१वश्यकता नाही. पण एकप्रकारे सहजयोगाचा प्रसार करु शकता.

अजूनही सहाजयोग सगळीकडे पसरला नाही, बऱ्याच लोकांना त्याबद्दल माहित नाही. उलट अगुरुबद्दल जास्त प्रसिध्दी आहे, तर आपल्या वागण्यामधून आपल्या ज्ञानातून आपल्या सर्व जीवनातून लोकांना हे लोक कोणीतरी वेगळे व विरळ आहेत असे वाटले पाहिजे. आजच्या या विशेष गुरुपोर्णिमेच्या मंगल दिवशी तुम्हाला विशेष आशिर्वाद मिळालेला आहे. दुसऱ्या शब्दात तुम्ही गुरुतत्त्वाच्या क्षमतेचे आहात. हे जणू प्रमाणपत्रासारखे आहे. सहजयोगांत घडणे हे महत्त्वाचे आहे, इतर गोष्टी सर्व निरर्थक आहेत. तुम्ही तसे घडा. विशेषत: स्त्रियांनी पुढे आले पाहिजे त्यात लाज वाटण्यासारखे काही नाही.त्यांनी सहजयोगाच्या कार्यासाठी पुढे यावे. त्या जर सहजयोगाविषयी बोलतील तर कार्याला अधिक गती येईल.

संतांचे अर्धवट राहिलेले हे कार्य आपण आपले कर्तव्य समजून पूर्ण करावे, असा मी आर्शिवाद देते.

ईश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद





# - भवसागर -

भवसागरासंबंधी प.पू.श्रीमाताजींनी वेळोवेळी केलेला उपदेश.


१) या तीनही शक्ति (महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली)जेव्हा वात्सल्यरुपात एकत्रित होतात किंवा जेथे तीनही शक्तींचा समन्वय होतो तेथे कुठल्याही प्रकारची घाण किंवा त्रास रहात नाही उलट अशी गोष्ट नित्य टवटवीत असते, नवीनच वाटते.हेच ते सद्‌गुरुतत्त्व

२) श्री दत्तात्रयामध्ये श्री ब्रह्मा विष्णू महेश या तीनही देवतांच्या पवित्रतेची शक्ति समन्वित झाली आहे ही शक्ती आपल्या नाभीच्या सभोवार ज्याला भवसागर म्हणतात त्यात समाविष्ट झालेली आहे.ही शक्ति अनेक वेळां जन्म घेत असते. आदिकालापासून श्री आदिनाथ या शक्तीचेच अवतार होत.आदिनाथजींच्या शक्तीबद्दल जैनांना माहिती नाही. तीन शक्तींमधून निर्माण होणारी ही प्रथम शक्ती. या शक्तीमधे धर्मांधता नाही.सन्याशाची जात नसते असे आपण म्हणतो. जर कोणी व्यक्ति मी अमुक जातीचा गुरु वा अमुक धर्माचा गुरु आहे असे म्हणत असेल तर निश्चित असे समजावे की ती व्यक्ति सद्‌गुरु नाही. सद्‌गुरु तत्त्वाची ओळखच ही आहे की सर्वधर्मांचे जे सार आहे किंवा सर्व धर्मांची नूतनता किंवा सर्व धर्मांचे भोळे रुप आहे ते त्या सद्‌गुरुतत्त्वात सामावलेले आहे.


३) भवसागर किंवा व्हॉइड(void) आमचा धर्म दाखविते आमचा धर्म मानव धर्म आहे आणि मानवधर्मात आमच्यामधे दहा गुण असणे आवश्यक आहे. हे दहा गुण आमचेमधे नसतील तर आपण मानवच नाही, एकतर जनावर तरी आहोत किंवा सैतान तरी आहोत. आमच्यामधील दहा धर्म या चक्राच्या बाजूला बांधलेले आहेत आणि मध्यभागी नाभी चक्रामधे या दहा धर्मांच्या पाकळ्या आहेत. धर्माकडे आमचे विशेष लक्ष असते. बेअक्कल लोकांना पण हे कळत नाही की धर्माधर्मात कलह कसा होणार? कारण ज्याची धारणा होते तो धर्म ज्यामळे मनुष्य असा बनतो, ज्याचे व्यक्तीत्व असे होते की ज्याला(collective) सामुहिक असे म्हणता येईल. तुम्ही तसे बनता तुम्हामधे सामूहिकता येते, ही धारणा मानवामधे होते, ती जनावरात होत नाही, धर्माची धारणा झाल्यावर हे धर्म आमच्यामधे जागृत होतात त्यावेळी कुण्डलिनी जागृत होऊन चक्राचे भेदन करीत वर चढते तेव्हा मनुष्यामधे सामुहिक चेतना जागृत होते.

४) तुमच्यामधे गुरुतत्त्व जागृत करण्यासाठी तुम्हाला स्वत:ला पूर्ण विकसित केले पाहिजे. प्रत्येकाने पाहिले पाहिजे, मागे मी सांगितल्याप्रमाने तुम्हामधे दहा तत्त्वं आहेत ही सगळी दाही तत्त्व अशा प्रकारे विकसित केली पाहिजे की आपण इतरांपेक्षा उठून दिसूं त्यासाठी तुम्हाला तुमच्या कमतरता न चुकता काढल्या पाहिजेत. एकदा का तुम्ही स्वच्छ झालात की ते प्रकाशित होतील. एकदा ते झालं की तुम्ही गुरु बनण्याच्या त्या बिंदुकडे पोहोचता. पण तरीही तुम्ही सत्गुरु होण्यासाठी तुम्हांला -अतित- स्थिती मिळवीली पाहिजे अतित स्थिती अशी आहे की एखादी व्यक्ती चांगली नसेल तर ती तुमच्यासमोर थरथर कापेल, खोटारडा इतरांना फसवणारा माणूस गप्प बसेल बाधा असलेले बरेच थरथर कापतील, सद्‌गुरुच्या प्रकाशात सगळे उघडकीला येतील.

५) गुरु हा शब्द म्हणजे गुरुत्वाकर्षण,( ग्राव्हिटी), पृथ्वीला गुरुत्वाकर्षण असते. जी व्यक्ती गुरु असते तिला गुरुत्वाकर्षण असावे लागते. जसजसे तुम्ही साक्षी होता तेव्हां तुमचे गुरुत्वाकर्षण व्यक्त होऊ लागते. आपल्या गुरुत्वाकर्षणामुळे आपण आपल्यातील त्या गहनतेला स्पर्श करतो, जी आपल्यामधे दैवी शक्ती वाहून नेऊ शकते आणि तिचे प्रकटीकरणही होते.



६) नुसते ध्यान लावून आपण किती लोकांवर व कां प्रेम करतो इकडे लक्ष द्या.अनुकंपा किंवा दया म्हणून नव्हे तर निखळ प्रेम आपण दुसऱ्याबद्दल बाळगतो का इकडे लक्ष द्या. सहजयोगामधे ज्याला गुरु बनायचे त्याला हे फार आवश्यक आहे, स्वच्छ अंत:करणाचे, उदार अंत:करणाचे व प्रेमाने हृदय भरलेले असे व्यक्तिमत्व तुमचे असले पाहिजे, म्हणजे तुमचे हृदयातून परमचैतन्याचे मंजुळ स्वर बाहेर येतील.







दहा गुरुंची अवतरणे

# श्री साईनाथ

''शिरडीचे साईबाबा'' या नांवाने ओळखले जाणारे श्री साईनाथ हे दहावे गुरु, अर्थात श्रीदत्तात्रेयांचे अवतरण. त्यांचा जन्मदिवस कधींच सापडला नाहीं पण तो सन १८३८ ते १८४२ या काळांतील आहे असे मानले जाते. सन १८७० च्या सुमारास ते महाराष्ट्रातील नगर जिल्हातील शिरडी या लहानशा गांवी प्रगट झाले तेच एक तेजस्वी आणि अलौकिक तपस्वी म्हणून. पुढें एकदा ते स्वत:च गूढ शब्दांत म्हणाले -'माझा जन्म कसा होणार? मी अविनाशी अस्तित्व आहे, मग मी जन्मलो म्हणजे काय?'

शिर्डीला आल्यावर साईबाबा एका निंबाच्या झाडाखाली रहात असत, जमिनीवरच झोपत असत आणि कुणाही भाविकाने दिलेले अन्न खाऊन रहात. कांहीं दिवसांनी एका हिंदु मंदिरात आश्रयाला गेले पण ते मुसलमान फकीर आहेत असे समजून तेथील पुजाऱ्याने मनाई केल्यामुळें - तोच पुजारी पुढें त्यांचा एकनिष्ठ भक्त झाला- एका पडक्या मशिदीमधें राहू लागले. तिथें त्यांनी कायम एका पेटता अग्नि-धुनी-ठेवली. त्याची राख उदी म्हणून ते भक्तांना देत व अजून लोक श्रध्देने ती वापरतात. मूठभर धान्य व तेलाचा दिवा एवढेच सामान त्यांच्याजवळ होते.

एकदा चेष्टा म्हणून कुठलाही वाणी त्यांना दिव्याकरितां तेल देईना म्हणून साईबाबा परत आले. पाठीमागून टवाळखोर दुकानदार लपून येत होतेच. परत आल्यावर बाबांनी दिव्यांत पाणी घालून वात पेटवली आणि दिवा पेटूं लागल्याचे पाहून लोक थक्क झाले अशी एक कहाणी आहे. त्यानंतर हा खरोखरच कुणी महात्मा बैरागी आहे अशी त्यांची कीर्ति झाली आणि लोक त्यांच्याभोवती जमू लागले. हळु हळु हा परिवार वाढूं लागला आणि बाबांजवळ आधारासाठीं, संकटाचे निवारण करण्यासाठीं, आजार बरे करण्यासाठीं, आशीर्वादासाठी अशा एक ना एक अनेक कारणांसाठी बाहेरगांवाहूनही लोक येऊं लागले. आजारी लोक रोगमुक्त झाले, पुत्रसंतान नसणाऱ्यांना पुत्रप्राप्ति




झाली, अश्रध्दांच्या मनांत श्रध्दा निर्माण झाली. अयोध्येचा जसा राम, मथुरेचा जसा श्रीकृष्ण तसे शिर्डीचे साईबाबा अशी शिर्डीची चहुंकडे प्रसिध्दि झाली. शिर्डीलाच जवळजवळ पन्नास वर्षे, सन १९१८ मधें देहावसान होईपर्यंत, त्यांचे वास्तव्य होते. साईनाथांची रहाणी, पेहराव, चालण्या-बोलण्याची पध्दत इ. सर्व सुरुवातीला जे होते त्यात कांहीहीं बदल झाला नाहीं. ते शिर्डीला कधीं आले, कुठून आले, त्यांचे मूळ नांव व जात वा धर्म कोणता हे शेवटपर्यंत कळले नाहीं; त्याबद्दल त्यांनी कधीं वाच्यता केली नाहीं. त्यादृष्टीने साईबाबा एक गूढ व्यक्तिमत्त्वच होते व आहे. बरेच वेळां त्यांचे बोलणे व उपदेश गूढ व संदेशात्मक असे. बऱ्याच उशीरा त्यांनी एका भक्ताला त्यांचे वास्तव्य होते त्या निंबाच्या झाडाखाली जमीन उकरण्यास सांगितले तेव्हा त्या ठिकाणी एक थडगे सापडले; तेच आपले, या जन्मीचे नव्हे पण आधींच्या एका जन्मातले, गुरु एवढेंच त्यांनी सांगितले.

साईबाबांनी कधींच कांही लेखन केले नाहीं वा पुस्तक लिहिले नाहीं. एखादे वेळीं कुणा शिष्यास ते कांही धार्मिक ग्रंथ वाचून दाखवण्यास सांगत; पण बहुतेक वेळा वाचण्यापासून परावृत्तच करत. एके ठिकाणीं त्यांनी असे म्हाटल्याचा उल्लेख आहे की 'बह्म समजण्यासाठी लोक ग्रंथ वाचतात आणि भ्रमांत पडतात' दुसऱ्या एका भक्तानें आपल्या पुस्तकांत लिहिले आहे की 'साईबाबांनी सूचित केले की ते कांही उपदेश वा प्रवचन करण्यासाठीं नव्हे तर जागृत (awaken)करण्यासाठी आले आहेत' त्यांच्या सर्व जीवनामधून प्रेम, करुणा व शांति यांचाच संदेश जाणवतो. त्यांनी कुठल्याही दूरच्या परगांवामधील भक्तांना, त्यांच्या संकटकाली, दर्शन देऊन संकटहरण केल्याच्या हकीगती अनेकजण सांगतात. एका ग्रंथकर्त्याने 'मी कितीही दूर असलो तरी माझ्या भक्ताला माझ्याकडे वेगवेगळ्या पध्दतीनें बोलावून आणतो. मीच त्यांना शोधून काढतो आणि माझ्याकडे यायला लावतो' असे साईबाबा म्हणाले असल्याचे लिहून ठेवले आहे.

श्री साईनाथांचा बराचसा उपदेश गूढ, सांकेतिक वा सूचनात्मक भाषेंत असे. भक्तांनी लिहिलेल्या अनुभवांमधील साईबाबांचे काही बोल :-

- माझ्याकडे येणारे बरेचसे साधक प्रापंचिक अडचणींसाठी येतात पण त्या सुटल्यावर कांहींजण मला समजूं लागतात.
- मातीची मडकी साफ़ करुन पालथी ठेवणाऱ्या बाबांना एकानें कुतूहलाने विचारल्यावर ते म्हणाले, 'मडकी अशीच पालथी ठेवलेली कांहींजणांना आवडते'
- बाबांकडे येणाऱ्या लोकांची गर्दी पाहून या सर्वांचा काय-काय फायदा होणार असे विचारल्यावर जवळच्या मोहोर लागलेल्या आंब्याच्या झाडाकडे बोट दाखवून बाबा म्हणाले 'या सर्व मोहोराला आंबे लागले तर किती छान होईल?पण त्यातील बराचसा गळून जातो आणि थोडेच आंबे तयार होतात'
- एका भक्ताला बाबांनी सहा रुपये मागितले; गोंधळून जाऊन दुसऱ्या एका वयस्कर व्यक्तीकडे पाहिल्यावर ती म्हणाली 'बाबा षड्रिपूंबद्दल बोलत आहेत'
- सगळे तुमच्यामधेंच आहे. शांत राहून आंत लक्ष द्या आणि जे ऐकू येईल तसे करा.
- माझ्याजवळ शांत बसा, बाकी मी सर्व कांही करीन.





# विष्णू तत्त्व

प.पू श्रीमाताजींचे लंडन येथील भाषण-संक्षिप्त

संदर्भ : निर्मल योग मे-जून ८४


भगवान विष्णूच्या मस्तकावरील सहस्त्रफणाधारी शेषाचे फुत्कार म्हणजेच एक प्रकारची मानसिक क्रियाच असते की जो त्याच्या मेंदूतर्फे जगाचे स्थैर्य व संतुलन राखण्याचा अविरत प्रयत्न असतो. भगवान विष्णू म्हणजे साक्षात विश्वपालकच व तेच सुषुम्ना नाडीचे स्वामी. त्यामुळे तोच आपल्या नाडी संस्थेचा मुख्य आधार असून विराटाच्या अति सुक्ष्मातीसुक्ष्म सर्व अंगाचे नियंत्रण करतो व त्यामुळेच मानवी शरीराचे सर्व कार्य सुरळीत चालू असते.त्याच्यामुळेच एका इंद्रियाकडून दुसऱ्या इंद्रियाकडे तसेच सर्व इंद्रियांनाही संदेश पाठविले जातात. भगवान विष्णूच आपल्या विविध शक्तिरुपाने स्वाधिष्ठान, मणिपूर, भवसागर, अनाहत, विशुध्दी, आज्ञा आणि अखेरीस महाविष्णू तसेच अहंकार व प्रतिअहंकार यांचे नियंत्रण करीत असतो. तोच सुक्ष्मातीसुक्ष्म स्वरुपात सुषून्ना नाडीच्या सुक्ष्मातीसुक्ष्म पातळीला (ब्रह्मनाडीला) स्पर्श करतो आणि त्याच्या कृमाप्रसादामुळे आपणास आत्मसाक्षात्कार प्राप्त होतो.

म्हणून विष्णू हा दोघांमधील दुवा आहे. त्यांच्या नजरेतून अति सूक्ष्मातीसूक्ष्म गोष्ट ही सुटू शकत नाही. त्याच्यामुळेच भिकाऱ्याचेही पालन- पोषण होते, सर्व मानवी व्यवहार सुरळीत चालतात, विवाहादि मंगलकार्ये पार पडतात. तोच जन्माला येऊ घातलेल्या प्रत्येक बालकाचा ललाट लेखही लिहीतो. थोडक्यात तोच ह्या अफाट व अचाट विश्वाचा संचालक आहे, त्यामुळे त्याने जर का क्षणभरही विश्रांती घ्यावयाचे ठरवले तर काय अनर्थ होतील याची कल्पनाच करावी. त्याच्या नित्यनूतन लीलेमुळेच हे विश्व विविधतेने नटले आहे, विश्व नाट्यमय बनले आहे.

त्याच्या महामायेमुळे जीवा जीवांना खेळविले जात असते. त्याची लीला व माया नसती तर सृजनकार्य व नाट्यमय जीवन न घडता फक्त निरिच्छ साक्षी आत्माच उरला असता. तोच माया व आदिशक्तीमधील दुवा आहे व शिवपरमात्म्याच्या लीलेचा शुद्ध साक्षी आहे. त्याच्याच जबाबदारीच्या जाणिवेमुळे व अनासक्त स्वभावामुळे डाव्या व उजव्या बाजूंचे संतुलन घडून विश्वाल स्थिरता लाभलेली आहे. यासाठी आपण सर्वदा त्याचे ऋणीच राहिले पाहिजे. विष्णूतत्त्व जागृत करण्यासाठी आपण संतुलित होऊन जबाबदारीने वर्तन करणे क्रमप्राप्त ठरते.

आम्ही योगी आहोत, आम्ही अनासक्त आहोत अशा गोष्टी बोलणे फारच सोपे आहे. भौतिक गोष्टींची मानवी जीवनात आवश्यकता आहेच. परंतु भगवान विष्णू हा सर्व श्रेष्ठ योगी होय. असे असूनही तो विराटाच्या शक्तिमाध्यमातून, सूक्ष्मातीसूक्ष्म रुपाने ह्या जड सृष्टीमध्ये भौतिक बदल घडवून आणतो, सृष्टी प्रकाशमय व मंगलमयही करतो. म्हणून आपण अनासक्त झाल्यावरही संतुलीत राहणे आवश्यक आहे. कारण आपण आत्मसाक्षात्कारी व्यक्ती म्हणून विराट पुरुषाच्या शरिरातील नाड्याच बनतो व त्यायोगे जडसृष्टीतही चैतन्य असल्याचा प्रत्यय येऊन आपण परमेश्वरी कार्यार्थ विष्णूदास बनतो. हा अत्यंत सूक्ष्म परंतु तितकाच महत्वाचा विचर आहे. त्यामुळे साधकाने त्याकडे दुर्लक्ष करणे उचित ठरणार नाही. त्यासाठी परवलीचे शब्द आहेत- अनासक्ती व जबाबदारी

भगवान विष्णु चारी धर्मांचा व्यवहार सांभाळतात. त्यापैकी एक गृहस्थाश्रम होय. आत्मसाक्षात्कारी व्यक्तीस ही एक महान तपस्याच असते. परंतु सामुदाइकतेची जाणीव नसेल तर त्या व्यक्तीचा टिकाव लागणे अशक्यच. कारण सृजनशीलतेचे मूळ जे उत्क्रांति व विविधता त्यालाच यामुळे धक्का बसतो. ही परमेश्वराची नाट्यमय लीला त्याच्याच इच्छेनुसार अस्तित्वात येत असते. त्यामुळे सामुदाईकतेच्या अभावी त्याला विरोध केला जातो. पुढारलेल्या समाजात व देशात असा एक (गैर)समज प्रसृत आहे की विवाह व गृहस्थाश्रम ह्या गोष्टी आपणास फक्त भोगासाठीच लाभलेल्य आहेत. ह्यात थोडेफार तथ्य असले तरी विराटाच्या व्यापक सृष्टीत त्याला सुप्त अर्थ आहे व तो म्हणजे त्यायोगे आपण आपले पारमार्थीक कर्तव्य (सुजनशिलता, पालनपोषण वगैरे)यथाशक्ती पार पाडून परमेश्वराल त्याच्या कार्यात साहाय्यभूत होणे. परंतु जर आपण भौतिक गाष्टींच्या मागे लागलो तर नकळत आपण आत्म्याला विसरतो, आपले पारमार्थीक कर्तव्य विसरतो व दैनंदिन व्यवहारात परमेश्वरी सहाय्यास पारखे होतो. त्यामुळे आपण परमेश्वरी शक्तीशी एकरुप होऊ शकत नाही; भक्तही होऊ शकत नाही तर निव्वळ गृहस्थाश्रमाचे (संसाराचे) ओझे वहात बसतो. त्याचीच काळजी करत बसतो. परंतु जे प्रमाणिक साधक असतात ते सुक्ष्मतेत जाऊन ही परमेश्वराची विचित्र लीला आहे हे जाणून आत्मशक्तिला प्राप्त करतात व त्यामुळे गृहस्थाश्रम हा त्यांच्यासाठी तपश्चर्या ठरते. त्याचे ओझे (क्लेश) मात्र परमेश्वरी शक्ती वाहात असते.



प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींनी नुकतीच कबेला मधील निवासातून दिसणाऱ्या पर्वतांकडे
पहात असताना केलेली इंग्लिश कविता व सैर अनुवाद

### Mountain

I see a mountain from my window
Standing like an ancient sage
Desireless, full of love.
So many trees and so many flowers
They plunder the mountain all the time.

And when the rain pours like
Many pitchers of clouds bursting
And it fills the mountain with greenery.

The storms may come soaring,
Filling the lake with compassion
And the rivers flow running down
Towards the calling sea.

The sun will create clouds and
Wind carries on its feathery wings
The rain on to the mountain.

This is the eternal play
The mountain sees
Without desires.

### पर्वत


खिडकीसमोरच्या पर्वतराजी मला साद देणाऱ्या
कुणा प्राचीन सिध्द पुरुषासारख्या दिसतात,
निरपेक्ष, निरिच्छ पण प्रेमभावनेने ओथंबलेल्या,
अनंत वृक्ष आणि फुलझाडे
त्यांच्या कुशीत विसावलेल्या असतात.

ढगांचा गडगडाट सुरू होतो आणि
अगणिक घागरी फुटाव्यात
तशा पर्जन्यधारा कोसळू लागतात
आणि समस्त सृष्टि हिरवीगार होते.

वादळे घोंघावू लागली तरी
तलाव करुणरसाने भरून जातात
आणि सागराला भेटण्यासाठी
नद्या भरभरून वाहू लागतात.

रविराज पाण्याचे कुंभ बनवतात
वायु त्यांना पंखावर सावरून घालवतो
आणि पुन्हां एकदा
पर्वतराजींवर पाण्याची बरसात होते.

निसर्गाचा हा खेळ
अखंडपणे चालूच असतो
त्याचा आनंद पर्वतराजींमधून उसळतो
पण स्वतः तो निरिच्छच.





# महाराष्ट्र सहजयोग सेमिनार २००२ वृत्तांत
# जळगांव

यावर्षीचा महाराष्ट्र सेमिनार जळगांव शहरात दि. २८ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २००२ या कालावधीत सपन्न झाला. सेमिनार जळगांवमधील प्रसिध्द जैन ठिबक सिंचन कंपनीच्या जैन हॉल या निसर्गरम्य ठिकाणी आयोजित केला होता. महाराष्ट्रातून साधारण १८०० सहजयोगी सेमिनारसाठी आलेले होते. महिलांची राहण्याची व्यवस्था मुख्य पेंडॉल शेजारीच केली होती, तर पुरुषांची व्यवस्था एक किलोमिटरवरील इक्रा या युनानी मुस्लिम होस्टेलमधे केली होती.

मुख्य पेंडॉल अत्यंत आकर्षक सजावटीने सुशोभित केला होता. स्टेजवर मागच्या बाजूला मधोमध पृथ्वी दाखविली होती व त्या पृथ्वीमधून कुंण्डलिनी बाहेर पडून वरच्या कमळाला स्पर्श करीत असल्याचा देखावा होता. त्याच्या बाजूला सर्वत्र 'आई' हा शब्द वेगवेगळ्या भाषेत लिहिलेला होता. एकंदरीत स्टेजच्या मागचे डेकोरेशन अर्थपूर्ण वाटत होते.

सेमिनारची सुरवात शनिवारी २८ रोजी सकाळी ११ च्या सुमारास 'वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ' या श्री अरुण आपटेंनी सादर केलेल्या गणेश भजनाने झाली. त्यानंतर श्रीगणेश मंत्र घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी 'तेरो ध्यान अती पावन', हे भजन म्हटले. नंतर जळगाव म्युझिक गृपने 'आवो माँ आवो तुम्हे सहजी पुकारे चले आज' हे भजन म्हटले. त्यावेळी जळगावचे श्री रविंद्र ठाकुर या नवीन गायकाची ओळख सगळ्यांना झाली. त्यानंतर पूजा करण्यात आली. पुजेच्या वेळी गणेश अथर्वशीर्ष घेतले तसेच पुजेची 'पूजनका अधिकार दिजीये, बिनती सुनिये आदिशक्ती, हर सास मे है सुमरन तेरा ,बोलो आदिशक्ती श्रीमाताजी, हे गिरी नंदिनी' ही भजने झाली. पूजा संपन्न झाल्यानंतर साधारण १० मिनिटांची विश्रांति झाली. नंतर हवनाची तयारी करण्यात आली. हवनाला श्री अरुण प्रधान, सातार्‍याचे श्री केंजळे, नगरचे श्री अशोक चव्हाण, वाशीच्या डॉ बुगदे, राहुरीचे श्री महेंद्र चव्हाण,सोनार, चांदेकर , जळगाव सेंटरचे लिडर श्री काब्रा हे उपस्थित होते. हवनाच्या सुरवातीला तीन महामंत्र, कलकी मंत्र, दुर्गा मंत्र, गणेश मंत्र, गणपती अर्थवशीर्ष, कुंजिका स्तोत्र, चंडिका मंत्र, आवाहन, श्रीमाताजींची १०८ नावे, शेवटी विश्ववंदिता होऊन आरती झाली. हवन यथास्थित पार पडल्याचे समाधान सर्वांच्या चेहर्‍यावरुन ओसांडून वहात होते.

हवन संपता संपताच पावसाचे वातावरण नसताना अचानक पाऊन आला आणि श्रीमाताजींचा सेमिनारला आशीर्वाद मिळाल्याचे सर्वांना जाणवले. पावसानंतर पेंडॉलमधील वातावरण अधिकच प्रसन्न झाले होते.

संध्याकाळी ६ वा. सेमिनारच्या संगीत कार्यक्रमाची सुरुवात जळगांव गृपच्या 'श्री माँ है रंगले चुनर मोरी रंग डाली' या भजनाने झाली. साधारण ७.३० च्या सुमारास श्री अरुण प्रधान यांच्या हस्ते सेमिनारचे उद्घाटन तसेच गणेश विशेषांक या पुस्तकाचे उद्घाटन झाले. त्यावेळी त्यांच्या भाषणाचा मुख्य विषय सहजयोगाचा प्रचार व प्रसार हा होता. त्याचप्रमाणे सहजयोग्यांमधे एकमेकांमधील प्रेमभावना वाढली पाहिजे ह्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. प्रेमशक्तीमुळे देशातील आतंकवाद नष्ट करु शकतो, सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.श्रीमाताजींचा संपूर्ण महाराष्ट्राला चरण स्पर्श झालेला असल्यामुळें आपण सर्वजण भाग्यवान आहोत हेहि त्यांनी आवर्जून सांगितले. त्यानंतर श्री रविंद्र ठाकुर जळगांव यांनी 'आई तुझिया नामाची ओढ लागली' हे गीत सादर केले. नाशिकच्या सौ शुक्ला यांनी ' सुमिर करके माता भवानी', 'अपने दिलमे सहजको बसाया करो' ही भजने सादर केली. आठ वर्षाच्या कु देशपांडे हिने 'ओंकार स्वरुपा सदगुरु समर्था' ह्या भजनावर अत्यंत सुंदर डान्स केला.

शेवटी प्रसिध्द सहज संगीत गायक श्री सुब्रमण्यम गायला बसले. त्यांनी सुरुवातीला 'शरण तुम्हारे अब मै', ' निर्मल माँ के चरण कमल पर मन लगा ओ इस युग मे', 'लहरला सहजाचा पताका लहरला', 'माऊलीने ठोठावले दार', 'ब्रम्ह शोधिले ब्रम्हांड मिळाले', सहस्त्रार स्वामिनी या भजनात श्री माताजींची १०८ नावे , 'नमो बुधे अहंकार चित्तानी' ही भजने सादर केली. नंतर श्री अरुण आपटेंनी म्हटलेल्या 'प्रित पराई, घर जावो लल्ला', 'हासत आली निर्मल आई' या भजनाने रात्री १०.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला.

रविवार दिनांक २९ सप्टेंबर च्या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात



सकाळी १० च्या सुमारास श्री अरुण प्रधान यांच्या भाषणाने झाली. त्यानंतर श्री अरुण आपटे गायला बसले. त्यांनी सुरुवातीला अली फतिमा, बेगुण गुण गाय, माताजी तुही भवानी, घर आई माताजी, संतांच्या गावी प्रेमाचा सुकाळ, नाही पुण्याची मोजणी, अबिर गुलाल ही त्यांची प्रसिध्द व सर्वांनी अनेकदा आनंद घेतलेली भजने सादर केली.

दुपारी बाराच्या सुमारास श्री महेंद्र चव्हाण राहुरी यांनी सर्वांना ध्यानाबाबत अत्यंत सुंदर मार्गदर्शन केले. त्यामध्ये ध्यानापूर्वी संतुलन कसे करावयाचे, निर्विचारता कशी आणायची ती टिकवून कशी ठेवायची, ध्यान कसे करायचे, बंधने घेणे का आवश्यक आहे इत्यादि अत्यंत उपयुक्त माहिती दिली. सदर कार्यक्रम सर्वांना अत्यंत आवडला

दुपारच्या भोजनाची व्यवस्था निसर्गसान्निध्यातील नयनरम्य आमराईत केली होती.

चारच्या सुमारास जैन उद्योग समूहाचे मालक श्री भवर जैन यांचा सेमिनारसाठी त्यांनी केलेल्या सहकार्याबाबत तसेच त्यांनी मोफत दिलेल्या जागेबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सत्कार करण्यांत आला. त्यांच्या भाषणात त्यांनी त्यांच्या जीवनात केलेल्या कष्टांची माहिती दिली.

श्री अरुण प्रधान यांनी युवाशक्तीला मार्गदर्शन केले. त्यावेळी युवाशक्ति लीडर श्री अरविंद ठाकुर यानें युवाशक्तीच्या वतीने विचार प्रकट केले.

श्री हरी जलान यांनी कबेला येथे नुकत्याच झालेल्या श्रीगणेश पूजेबाबत माहिती दिली. त्यांच्या माहितीमधून सर्वांना गणेश पूजेला कबेल्याला गेल्यासारखे वाटले. त्याचप्रमाणे त्यांनी लहान मुलांच्या वागण्याबाबत माहिती दिली.

श्री राजेंद्र पुगालिया यांनी गणपतीपुळे सेमिनार च्या तयारीची माहिती दिली. त्यामधे यावर्षीच्या गणपतीपुळे सेमिनारमध्ये अनेक सुधारणा करावयाच्या असल्याने सर्वांचा सहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच ज्यांना सेमिनारमधे काम करावयाचे आहे त्यांनी आपला बायोडेटा देण्याबाबत आवाहन केले. तसेच गणपतीपुळे सेमिनारच्या तयारीची माहिती दिली.

डॉ उदवानी, अमरावती यांनी चक्रांबाबत माहिती दिली. इक्रा या मुस्लिम युनानी कॉलेजच्या होस्टेल ज्या ठिकाणी आपल्या पुरुष सहजयोग्यांची राहण्याची उत्तम व्यवस्था केली होती त्यांच्या चार प्रतिनीधींचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांच्या भाषणात त्यांनी जगात हिंदु-मुस्लिम, ऐक्याने राहण्यासाठी सहजयोग अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले, तसेच त्यांची संस्था सहजयोगाबाबत अत्यंत प्रभावी झाली असल्यासे सांगितले. वाशी हॉस्पिटलच्या प्रमुख डॉ. मिसेस बुगदे यांनी महिलांनी सहजयोगासाठी करावयाच्या कामांसंदर्भात विचार मांडले. साधारण ९.०० वा कार्यक्रमाची सांगता झाली.


सोमवार दिनांक ३०सप्टेंबर च्या कार्यक्रमाची सुरवात सकाळी १० च्या सुमारास तीन मंत्रांनी झाली, त्यानंतर श्री सुब्रमण्यम यांनी 'देदी है जागृती' हे भजन सादर केले. श्री अशोक चव्हाण यांनी प्रभावीपणे त्यांचे अनेक खुसखुशीत अनुभव व विचार मांडले. श्री जगताप(मुंबई) यांनी कोकणात करीत असलेल्या प्रचार कार्याची व अनुभवाची माहिती दिली. त्यामध्ये पत्रकारांना माहिती देताना त्यांना प्रत्यक्ष जागृति घेण्याची विनंति केली व त्यानुसार नंतर पत्रकारांनी वर्तमानपत्रात सहजयोगाची फार स्तुति केली. श्री अरुण आपटे यांनी सहजयोगाच्या कार्यक्रमाचे वेळेस संगीताचा कसा उपयोग होतो हे सविस्तर समजावून सांगितले.

डॉ बुगदे यांनी वाशी हॉस्पिटल मधील अनुभव सांगितले. त्यानुसार वाशी हॉस्पिटल हे सहजयोग्यांसाठी असून जे प.पू. श्रीमाताजींना आदिशक्ती मानतात अशांसाठी आहे असे सांगितले. अनेकजण गंभीर आजाऱ्यांना उपचारासाठी घेऊन येतात. हे योग्य नसल्याचेही सांगितले. तसेच प्रचार करताना आपले सर्व रोग जागृतीमुळे बरे होतात असे चुकीचे सांगितले जाते, वास्तविक श्रीमाताजींच्या कृपेत आपली शक्ति जागृत झाल्यानंतर त्या शक्तीचा उपयोग करुन आपले सर्व प्रश्न सुटतात. अशा प्रकारे माहिती देण्याची सूचना केली.

जळगांवच्या युवाशक्तीने 'ममता मई दुर्गासी लागे' या रेकॉर्ड वर गरभा सादर केला. लहान मुलांनी अगुरुबाबत एक सुंदर नाटक सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली. दुपारी १.३० वा जेवणाची सुट्टी झाली. साधारण ३.३० च्या सुमारास नाशिकच्या श्रीमती आव्हाड यांनी अत्यंत प्रभावीपणे आपले विचार मांडले; त्यामध्ये आपण सुरवातील सहजयोग विनामूल्य असल्याचे सांगतो मात्र प्रत्येक पूजेला पैसे घेतो त्यामुळे गरीब सहजयोग्यांना पूजा परवडत नाही. हा एक नवा विचार मांडला.

श्री अरुण प्रधानांनी सेंटर कशा प्रकारे चालवावीत तसेच प्रोटोकॉल्स, प्रिंटींग साहित्याबाबत माहिती दिली. भाषणाच्या शेवटी त्यांनी सेमिनार योजनाबध्द व यशस्वीपणें पार पाडल्याबद्दल कार्यकर्त्यांचे कौतुकास्पद आभार मानले.

अशा तऱ्हेनें जळगांव येथील महाराष्ट्र सेमिनार श्रीमाताजींच्या कृपेत उत्साहवर्धक व आनंददायक वातावरणांत संपन्न झाला.



# गणपतीपूळे हवन कार्यक्रम

श्री क्षेत्र गणपतीपुळे येथें दि.१९,२० ऑक्टोबर २००२ या दिवसांत निर्मल-नगरीमध्यें डिसेंबर मधील वार्षिक आंतर -राष्ट्रीय सेमिनारची पूर्वतयारी म्हणून हवनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

दि. १९ रोजी सकाळपासून सहजयोगी बंधू-भगिनींचे आगमन सुरु झाले. सर्वजण निर्मल-नगरीच्या चैतन्यमय वातावरणांत सामूहिकतेत आल्याच्या आनंदात एकमेकांशी संवाद साधण्यांत व समुद्राच्या सान्निध्यात ट्रीटमेंट्स करण्यात गर्क झाले. सुमारे ४००-४२५ योगी कार्यक्रमासाठीं उपस्थित होते.

दिनांक १९ ला संध्याकाळपर्यंत कांही खास कार्यक्रम ठेवलेला नव्हता.त्यामुळें पेंडालमधेंच बसून सहजयोगी एकमेकांत सहजयोगाच्या गप्पा मारण्यात वा ध्यान करण्यात मग्न होते. काही योगी लहान ग्रुप करुन भजने म्हणत होते.

संध्याकाळच्या भोजनानंतर संगीत कार्यक्रम आयोजिला होता.सुरवातीला श्री नलगीरकर साहेबांनी आपले विचार मांडले. भारतातील प्रत्येक राज्यामध्ये श्रीमाताजींनी राज्यप्रमुख नेमून दिले असल्याचे सांगून भारतामधील प्रचार-प्रसार कार्याचा आढावा घेताना उत्तर भारतात, विशेषत: उत्तरप्रदेश व पंजाबमध्ये, फारच जोमाने सहजयोगाचा प्रसार होत असल्याचे त्यांनी नमूद केले. उत्तर प्रदेशात सर्व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं केंन्द सुरु झाल्याचा त्यांनी मुद्दाम उल्लेख केला.तसेच या वर्षी सहजयोग्यांच्या उपस्थितीत गणपतीपुळ्यांमध्येंच डिसेंबरच्या सोहळ्याची पूर्वतयारी करणाऱ्या कार्यकर्त्यासाठी या हवन योजनेचे विशेष समजावून सांगितले.

त्यानंतर हैद्राबादचे संगीत कलाकार श्री सुबम्हण्यम यांनी श्रीमाताजीं वरील स्तुतिभजने सादर केली. त्यांच्यासमवेत त्यांनीच प्रशिक्षित केलेले नाशिक व पुणें येथील कांहीं सहजयोगीही होते. ह्या नवीन भजनांमुळें श्रोते आनंदी होते.रात्रीच्या भोजन विश्रामानंतर श्री अरुण आपटे यांनी सुमारे दीड-दोन तासामध्यें संगीत कार्यक्रमाचा समारोप सर्व चक्रांना पोषक अशी रागधारी व भजने सादर करुन केला व सर्वांना चैतन्यमय संगीताचा आनंद मिळाला.

दिनांक २० ला सकाळी ८ वा हवन सुरु झाले.असे हवन डिसेंबर मधील सेमिनारसाठीं कार्य करणाऱ्यासाठीं महिनाभर अगोदर पासून आलेल्या कार्यकर्त्यांसाठीं दरवर्षी होत असे.यावर्षी प्रथमच सहजयोग्यांच्या उपस्थितीत हे हवन करण्याची योजना पुढे आली. राष्ट्रीय सहजयोग प्रमुख श्री नलगीरकर जातीने उपस्थित होते व नाशिक, जळगांव, इंदूर, कोल्हापूर, हैद्राबाद, कलकत्ता, अहमदाबाद, दिल्ली, कोकण इ. अनेक ठिकाणांहून लिडर मंडळीही आली होती. हवनाचा कार्यक्रम पुणें केंद्रप्रमुख श्री राजेंद्र पुगालिया यांच्या मार्गदर्शनाखाली झाला व सुमारे १० वा. यथासांग पार पडला.

हवन कार्यक्रमानंतर श्री नलगीरकर यांनी मार्गदर्शन केले. आपल्या छोटयाशा भाषणांत कार्यकर्त्यांनी कार्यक्रम ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणेंच पार पाडण्यावर भर दिला. तसेच गणपतीपुळ्याला येऊन काम करणारा तेवढाच फक्त कार्यकर्ता असे नसून सहजयोगाचे कुठेही, कधीही व कसलेही कार्य करणारा हाही कार्यकर्ताच असतो हेहिविशद केले आणि म्हणून आपापल्या आवडीप्रमाणें व कुवतीनुसार प्रत्येक सहजयोग्याने झटले पाहीजे यावर भर दिला.गणपतीपुळ्याच्या सेमिनारच्या तयारीला सुरवात होत असल्याचे जाहीर करून युवा सहजयोग्यांना त्यात मोठया संख्येने सहभागी होण्यासाठीं आवाहन केले. यानंतर हवनाचा कार्यक्रम संपला असे जाहीर केले गेले.

## सहज समाचार


सहजयोग पुणे केंन्द्रावर शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर २००२ ला साप्ताहिक सामूहिक ध्यानांसाठी महाराष्ट्र -प्रमुख श्री अरुण प्रधान उपस्थित होते. ध्यानाचा कार्यक्रम संपल्यावर त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांनी केलेल्या सूचना :

१) युवाशक्ति ही आतां प्रभावी शक्ति झाली आहे. कार्यक्रमांचे वेळी कष्ट घेण्याव्यतिरिक्त त्यांना प्रबोधन केले जावे व कार्यक्रमांचे वेळीं काय व कशा तऱ्हेनें सहजयोग सांगावा यासंबंधीची रुपरेषा तयार करावी.

२) महिलाशक्ति आतां प्रभावीपणें कार्यशाली होणे आवश्यक आह. त्यासाठी कांही निश्चित योजना तयार केली जावी व महिलांनी पुढाकार घेण्यासाठी आपणहून पुढें यावे.

३) सहजयोग्यांनी आपापसात प्रेमभावना वाढवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणें आवश्यक आहे.

४) गणपति-पुळें सेमिनार २००२ साठीं पुणे-केन्द्रातर्फे होत असलेली तयारी व पुढाकार कौतुकास्पद आहे.





# पूजाविधीचे महत्त्व

प.पू.श्रीमाताजींच्या साक्षात् चरणकमलांची वा प्रतिमाचरणांची पूजा करण्यासाठीं उपस्थिती लाभणें हे सहजयोग्यांचे भाग्य आहे व या पूजाप्रसादाचा लाभ सर्वांनी जाणीवपूर्वक मिळवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.या पूजाविधीमधें श्रीमाताजींचे साक्षात् अस्तित्व असल्यामुळे पूजेसाठीं उपस्थित राहणें ही सहाजयोग्यांवर खास जबाबदारी आहे हे ओळखून योग्यांनी पूर्ण समर्पित भावना बाळगुन श्रीमाताजींच्या चरणावरच पूर्ण वेळ चित्त ठेवल्यावर पूजेचा प्रसाद मिळत असतो.

पूजा संपूर्णपणे हृदयातून झाली पाहिजे; त्यामुळें हृदयस्थ आत्मा श्रीमाताजींची पूजा केल्यानें प्रसन्न होतो आणि आपण चैतन्य-प्रसादामधें चिंब होऊन जातो. पूजा हा साधकांना परमानंद देणारा विधी असतो आणि त्यांतून योगी अध्यात्मिक प्रगतिपथावर राहतात.

- ''पूजा हृदयांतून झाली पाहिजे तरच त्या पूजेचा आनंद शाश्वत व चिरंतन होतो.''(श्रीमाताजी)
- ''पूजेमध्ये निर्विचारता साधली की हृदयातून पूजा केली जात आहे हे लक्षात घ्या.''(श्रीमाताजी)
- ''पूजेमधें तुम्ही उन्नत होत असता. कांही जणांना ही स्थिति टिकवता येते तर कांहींजण यो-योसारखे आत-बाहेर होत असतात. म्हणून निर्विचार स्थितीत ध्यानात राहणे आवश्यक असते''(श्रीमाताजी)
- पूजा तुम्ही स्वत:साठी करत नसून मला जाणणाऱ्या समस्त सहजयोग्यांसाठी करता. म्हणून पूजेचा तीर्थ -प्रसाद सर्वांसाठी असतो. म्हणून अजून अर्धवट असलेल्या सहजयोग्यांना दूर ठेवणे चांगले.''(श्रीमाताजी)

**उपकरणे व सामग्री :** पूजेची सर्व उपकरणें - समई, निरांजन, कलश, तबक, तांब्याची भांडी, अभिषेकाची थाळी इ.- घासून चकचकीत असावी आणि कुंकुमतिलक लावून सुशोभित करावी. पूजासाहित्याला तत्त्वार्थ असतो. कलशंकुभ श्रीगणेश व कुण्डलिनीचे, नारळातील पाणी सागराचे, कलशातील पाणी पवित्र तीर्थाचे व पाने-फुले पृथ्वीतत्त्वाचे द्योतक असतात. कुंकुममिश्रित अक्षता स्वागतार्थ दर्शवतात. सुपारीरुपात श्रीगणेश पूजेमधील विघ्न दूर करण्यासाठीं, पंचामृत अभिषेकासाठीं असते. दिवा(ज्योत) ज्ञानदर्शक, हळकुण्ड कल्याणदायक, कुंकु मांगल्यदायक व सिंदूर उन्नतिदायक अशा अर्थानें वापरले जाते.

**मंत्र :** पूजेच्या वेळेस जे मंत्र म्हणतो त्यांचे उच्चार स्पष्ट व शास्त्रशुध्द असले पाहिजेत व ते नीट स्वर-लयीत म्हणणे आवश्यक आहे. तसे म्हटल्यावरच मंत्र अर्थपूर्ण व चैतन्यवाहक होतात. श्री गणेश मंत्र व अथर्वशीर्ष श्रीगणेशांना आवाहन करण्यासाठीं व मूलाधार चक्र जागृत करण्यासाठीं, श्रीविष्णूंची २४ नावे नाडी शुध्दीसाठीं, प्राणायाम डावी व उजवी बाजू संतुलनांत आणण्यासाठी, गुरु-मंत्र भवसागर जागृत करण्यासाठीं, गायत्री मंत्र पंचमहाभूत देवतांना आणि ज्ञानवृध्दीसाठी सूर्याला आवाहनासाठीं म्हटले जातात.

- ''पूजेमधें मंत्र पूर्ण श्रध्देने म्हटले पाहिजेत. श्रध्देला अन्य पर्याय नाही. श्रध्दाभावनेने मंत्र म्हटल्यानंतरच त्यांतून प्रसादरुपी चैतन्यलहरी प्रवाहीत होतात.''(श्रीमाताजी)

**संगीत :** पूजेमधें भजनें व श्रीमाताजींची स्तुति करणारी पदे म्हणावीत. भारतीय संगीतशास्त्राप्रमाणें भजने,गाणी म्हटल्यास चैतन्य अधिक प्रवाहित होते, कुण्डलिनी प्रसन्न होते व पूजेचा आनंद वृध्दिंगत होतो. संगीतामधून आपली भक्ति व समर्पण व्यक्त व्हावे.

**सहजयोग्यांसाठी काहीं सूचना**

- पूजेचा चैतन्यमय प्रसाद मिळण्यासाठीं योगी पूजेला उपस्थित राहतात.
- सामूहिक चक्रशुध्दि पूजेमधून होत असते. म्हणून चित्त सहस्त्रारांत ठेवले की श्रीमाताजींनी प्रवाहित केलेले चैतन्य खेचले जाते व योगी स्वच्छ होतो. हे घडले नाहीं तर श्रीमाताजींना त्रास होतो.
- पूजेसाठी मिळेल त्या जागेवर स्वस्थ बसावे, त्याबाबतीत चिकित्सा करुं नये.
- पूजा संपल्यावर पूर्ण शांतपणे थोडा वेळ बसावे व चैतन्याचा आनंद प्रस्थापित करावा.

आपले डोळे सतत उघडे ठेवावे कारण आपण श्रीआदिशक्तिच्या समोर असतो.






# महाराष्ट्र सहजयोग सेमिनार जळगांव २००२













